गुरुवार, २३ फेब्रुवारी २०२३
किंमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -१७९
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● THURSDAY 23 FEBRUARY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-179 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-14 ● PRICE-5




# बळीराजाचा किती अंत पाहणार ? संतप्त शेतकरी वर्गाचा सवाल !

## वणी, बुलढाणा येथे स्वाभिमानीचा रस्ता रोको; रस्त्यावर फेकले कांदे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : संपूर्ण महाराष्ट्रामध्ये शेतकऱ्यांचे प्रश्न तीव्र झालेले आहेत. द्राक्ष, कांदा, सोयाबीन ,कपाशी यासारख्या पिकांचे बाजारभाव गडगडले आहे. शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च सुद्धा निघत नाही. पिकविम्याचे पैसे मिळत नाही. त्यातच वीजदर वाढ सरकारने प्रस्तावित केली आहे .ज्या शेतकऱ्यांचे विज बिल थकले आहे त्यांचे कनेक्शन कट होत आहे. यामुळे संपूर्ण राज्यातला शेतकरी त्रस्त आहे. यासह अनेक प्रश्नांवर लक्ष वेधण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने पुकारलेल्या राज्यभरातील रस्ता रोको आंदोलनाला आज नाशिक जिल्ह्यामध्ये सुद्धा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तर बुलढाणा येथे विदर्भ अध्यक्ष प्रशांत डिक्कर यांच्या नेतृत्वाखाली शेकडो शेतकऱ्यांनी मध्य प्रदेशकडे जाणारा अकोला-बऱ्हाणपूर महामार्ग रोखून धरला. यामुळे मार्गावरील वाहतूक ठप्प होऊन वाहनांच्या दीर्घ रांगा लागल्या. शेतकरी विरोधी सरकारचा निषेध करण्यासाठी संतप्त शेतकऱ्यांनी कापूस-कांदे रस्त्यावर फेकून महामार्ग अडवला. शेतकऱ्यांची प्रचंड गर्दी, गाड्यांच्या लांब रांगा असल्याने पोलीस प्रशासन हतबल झाले होते. कापूस-सोयाबीन-कांदा भाववाढ प्रश्नावर सरकारने निर्णायक भूमिका घ्यावी अन्यथा मंत्र्यांच्या गाड्या फोडू, असा इशारा डिक्कर यांनी दिला.**



नाशिक जिल्ह्यातील साधारण 62 हजार शेतकऱ्यांच्या जमिनीची लिलाव प्रक्रिया सुरू झालेली आहे. याविरुद्ध पालकमंत्री दादा भुसे यांच्या घरासमोर राजू शेट्टी यांच्या नेतृत्वात बिराड आंदोलन झाले. या आंदोलनामध्ये ओटीएस देण्याच्या आश्वासन शासनाने दिले होते. परंतु याची आठवण राज्यकर्त्यांना राहिली नाही. तसेच द्राक्ष आणि कांदा या प्रमुख पिकांचे भाव नाशिक जिल्ह्यामध्ये गडगडले आहे. कांदा चार ते सहा रुपये किलोने विकतो आहे. शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च सुद्धा निघत नाही. यामुळे कांदा उत्पादक शेतकरी त्रस्त आहे. बांगलादेशाने आयात शुल्क वाढवल्यामुळे भारतातून बांगलादेशमध्ये जाणारे द्राक्ष कमी झालेत व मोठ्या प्रमाणामध्ये द्राक्षाचा मार्केट कोसळले. यामुळे द्राक्ष उत्पादक शेतकरी सुद्धा त्रस्त आहे. हे सगळे प्रमुख विषय घेऊन आज वणी येथील शेतकऱ्यांनी रस्ता रोको आंदोलन केले या आंदोलनात स्वाभिमानी शेतकरी संघटनेसोबत नाशिक जिल्हा बँक शेतकरी बचाव कृती समितीचे अध्यक्ष प्रशांत कड, गंगाधर निखाडे , संतोष रेहरे, विलास भवर, विलास कड, प्रकाश शिंदे, भूषण घडवजे, बापू महाले, चिंधु पगार, रामहरी तिडके, शिवाजी निखाडे, सुकदेव निखाडे,शिवाजी पानसरे, बाळासाहेब घडवजे, आनंदाबदू चौधरी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे दिंडोरी तालुका अध्यक्ष संदीप उफाडे यांच्या सह अनेक प्रमुख शेतकरी नेते व शेतकरी सक्रिय सहभागी झाले होते.

### अन्यथा विधानभवनावर फेकणार कांदे व जिल्हा बँकेच्या नोटिसा

कांदा चार ते सहा रुपये किलोने विकतो आहे . बांगलादेशासारखं राष्ट्र आपला कांदा खरेदी करत नाही . चुकीच्या परराष्ट्र धोरणामुळे आपण अनेक शत्रू तयार करून घेतले . त्याचा फटका शेतकऱ्यांना बसतो आहे . जगामध्ये नव्या बाजारपेठा शोधण्यात हे सरकार अपयशी ठरलंय . यामुळे कांद्याचे भाव पडलेत . कांदा प्रश्नावर सरकारने लक्ष दिलं नाही व नाशिक जिल्ह्यातील 62 हजार शेतकऱ्यांना जिल्हा बँकेच्या संदर्भाने बिऱ्हाड आंदोलनात दिलेले पालकमंत्र्यांनी आश्वासन पाळलं नाही तर अधिवेशन काळामध्ये कांदे व जिल्हा बँकेच्या जप्तीच्या नोटिसा आम्ही विधानभवनावर फेकणार .

**– संदीप जगताप, प्रदेशाध्यक्ष , स्वाभिमानी शेतकरी संघटना**

# रेल्वे मार्गाचे विद्युतीकरणाचे काम डिसेंबर २०२३ पर्यंत होणार पूर्ण

आधुनिक केसरी न्यूज

औरंगाबाद : 'रोटेगाव ते औरंगाबाद दरम्यान रेल्वे विद्युतीकरणाचे काम पूर्ण झालेले आहे. पुढील टप्प्यात औरंगाबाद ते जालना दरम्यान काम मार्च अखेरपर्यंत पूर्ण केले जाणार आहे. नांदेड विभागाअंतर्गत येणाऱ्या रेल्वे मार्गाचे विद्युतीकरणाचे काम डिसेंबर २०२३ पर्यंत पूर्ण होणार आहे,' अशी माहिती रेल्वे विभागाकडून देण्यात आली आहे.


गेल्या काही वर्षांत डिझेलचे दर वाढलेले आहे. याचा फटका रेल्वे विभागाला सोसावा लागत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या विद्युतीकरणाला गेल्या काही वर्षांपासून वेग देण्यात आलेला आहे. यात अंकाई ते रोटेगाव दरम्यान विद्युतीकरणाचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे. रोटेगाव ते औरंगाबाद मार्गावर विद्युतीकरण पूर्ण झालेले आहे. या मार्गाची पाहणी करण्यात आलेली आहे. औरंगाबाद मार्गासह नांदेड विभागातंर्गत येणाऱ्या अन्य मार्गावर विद्युतीकरणाचे काम सुरू आहे.

नांदेड विभागात एकूण चार मुख्य मार्गावर विद्युतीकरणाचे काम हाती घेण्यात आलेले आहेत. यात परभणी ते परळी, अकोला ते पूर्णा , मुदखेड ते मनमाड आणि आदिलाबाद ते मुदखेड या मार्गाचा समावेश आहे. सध्या सुरू असलेल्या प्रकल्पांमध्ये अकोला- हिंगोली, मनमाड-रोटेगाव आणि आदिलाबाद ते हिमायतनगर या मार्गावर विद्युतीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. उर्वरित काम डिसेंबर २०२३ अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. मराठवाड्यात विविध भागांत रेल्वे मार्ग विद्युतीकरण करण्यात येत आहे. या मार्गावर वीजपुरवठ्यासाठी उपकेंद्र तयार करण्याची प्रक्रिया सुरू आहे. औरंगाबाद मार्गावर रोटेगाव येथे उपकेंद्र तयार होत आहे. याशिवाय विविध भागांत विविध ठिकाणी उपकेंद्रद्वारे वीजपुरवठा होणार आहे. सदर कामे प्रगतिपथावर असून, ही कामेही डिसेंबर अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन असल्याची माहिती नांदेड रेल्वे विभागीय व्यवस्थापक उपिंदर सिंह यांनी दिली.



### वर्ष २०२४ मध्ये डिझेल इंजिन बाद

रेल्वे विभागाने नांदेड विभागात रेल्वे विद्युतीकरणाचे काम वेगात सुरू केले आहे . सध्या औरंगाबाद मार्गासह अन्य काही मार्गावर डिझेल इंजिन चालविण्यात येत आहे . डिसेंबर २०२३ पर्यंत काम पूर्ण झाल्यास, वर्ष २०२४ मध्ये औरंगाबाद मार्गासह नांदेड विभागातील अन्य मार्गावर डिझेल इंजिनची सेवा खंडीत केली जाणार असल्याचे संकेत रेल्वे विभागाकडून देण्यात आले आहे .





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


## स्वामी कृपा

आधुनिक केसरी

मागच्या वेळेप्रमाणे यावेळीही रेश्माने मानवसेवा महत्वाची मानून स्वामींसाठी केलेले लाडू त्या व्यक्तीला नेऊन दिले. आता मात्र तिचे मन तिला खात होते. आपल्या हातून स्वामींची अपेक्षित सेवा घडली नाही याची तिला खंत होती. रंजनाताईंजवळ तिने मोकळे केले. त्या पुन्हा म्हणाल्या, ' स्वामी खूप दयाळू आहेत. ते रागावत नाहीत. तू अडलेल्याला मदत केलीस याचा त्यांना आनंदच होईल. ' आता मात्र पुढच्या गुरुवारी स्वामींचा नैवेद्य चुकू द्यायचा नाही असे तिने मनोमन ठरवले.

आता स्वामीकृपेने रेश्मा आणि नितीनचा संसार सुखात चालला होता. लवकरच गुरुवार आला. आता तिने स्वामींना नैवेद्य म्हणून मागच्या गुरुवारचे मेथीचे आणि डिंकाचे मिळून एकत्र लाडू बनवून अर्पण करायचे ठरवले. आजच तिला एक वाजता एका ठिकाणी मिटिंगसाठी जायचे होते. त्या ठिकाणी तिला एक ऑर्डर मिळणार होती. शिवाय संध्याकाळी पाच वाजता देखील एका ठिकाणचे बोलावणे आले होते. त्या ठिकाणी देखील काही ऑर्डर मिळण्याची शक्यता होती. सकाळी लवकर उठून तिने घाईघाईने सगळी कामे आवरली. नितीनला डबा तयार करून दिला. आणि स्वामींना नैवेद्य दाखवून पुढे तसेच मीटिंगला जाण्याच्या दृष्टीने तयारी केली. आता साडेअकरा झाले होते. घाईघाईत तिने आपली बॅग उचलली आणि घराला कुलूप लावून बाहेर पडली. आज ठरल्याप्रमाणे स्वामींना आपण नैवेद्याचे लाडू अर्पण करणार याचा तिला कोण आनंद झाला होता. तिथे गेल्यानंतर तिने स्वामींना नैवेद्य ठेवण्यासाठी आपली बॅग उघडली आणि तिला धक्काच बसला. तिला लक्षात आले की आपण निघण्याच्या घाईत तो लाडवांचा डबा किचन ओट्यावरच विसरून आलोय. तेवढ्यात एक आजी तिथे आल्या.





## आनंदी पहाट

### मानसिकतेचा विचार अभ्यासपूर्वक करावा

आधुनिक केसरी

आपल्या घराचा संबंध आपल्या मनाशी असतो, तसंच घराच्या अंतरंगाचा संबंध त्या घरात राहाणाऱ्या व्यक्तींच्या अंतर्मनाशी असतो. त्यांचं परस्परांमध्ये एक निराळं नातं असतं. आपलं स्वतःचं, हक्काचं, आपल्या स्वप्नातलं असं घर की जे नेहेमीच आपलं वाटत असतं केवळ आपल्या अंतर्मनातील भाव भावनांमुळे. आपल्या मनातलं घर आणि घरातलं मन हे कधीही एकमेकांपसून वेगळं होऊ शकत नाही. त्यामुळे मानसशास्त्रीय दृष्टीकोंनातून घरातील वातावरण असणं आवश्यक ठरतं. यामध्ये कुटुंबातील प्रत्येक सदस्याचा विचार करावा लागतो. प्रत्येकाच्या मानसिकतेचा अभ्यासपूर्वक विचार करावा लागतो. प्रत्येकाच्या विचारांप्रमाणे आवडी-निवडी, अपेक्षा, गरजा, शारीरिक व्यक्तिमत्व हे निराळं असतं. त्याप्रमाणे त्याला साजेसं, शोभेल असं घरातलं वातावरण असणं निश्चितच उपयोगाचं ठरतं. घरातील विविध वस्तू त्यांचे रंग, वस्तूंचे विविध आकार, निरनिराळे प्रकार, त्यांची कल्पकतेने केलेली मांडणी अशा अनेक बाबींचा थेट संबंध आपल्या मनाशी येत असतो, त्यामुळेच त्याचा परिणाम कमी अधिक प्रमाणात आपल्या मानसिकतेवर होत असतो. आपलं मानसिक स्वास्थ्य मिळवण्याची आणि टिकवण्याची ती आपली हक्काची जागा असते. आपल्या अंतर्मनातील आनंद निर्माण करण्याची बाब ही जितकी महत्वाची असते तितकंच सौंदर्याला देखील महत्व असतं. आपण आपल्या जीवनात सौंदर्याचा शोध घेत असतो तेव्हा ते अधिकाधिक कसं मिळवता येईल यासाठीच प्रयत्नशील असतो. सुंदरता, ही आपल्या प्रत्येक गोष्टीकडे बघण्याच्या दृष्टीकोनावर अवलंबून असते. आपल्या जीवनामधील सौंदर्याचं स्थान आणि महत्व हे तेव्हाच आपण अनुभवू शकतो. आनंद मिळवून जीवन जगण्यातच आपलं मनःस्वास्थ्य टिकून राहू शकतं.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655




आधुनिक केसरी

**सत्कर्मात डोले | पांडुरंग ||**
पातकी मनाची | साथ अधर्माला ||
जाग स्वधर्माला | कैसी येई? ||१||
दान-धर्मासाठी | नाही आला पुढे ||
तुझ्या गाठी पडे | पुण्य कैसे? ||२||
हरिनाम कधी | नाही आले मुखी ||
कैसा होशी सुखी | संसारात? ||३||
दुर्जनांचा संग | घडे रात्रंदिन ||
त्याची कैसी दैना | फिटेल रे? ||४||
सावध हो मना | सोड वृथा संग ||
जाण अंतरंग | भजनाचे ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी

बुद्धीला पटेल ते कर. मनाला रुचेल तेही कर. या दोहोतही अतिरेक होणार नाही याची दक्षता घे.

तू स्वतःची एकट्याची काळजी घेण्यापेक्षा इतरांची काळजी घेतलीस तर तुझी काळजी घेणाऱ्यांची संख्या वाढते.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

मद्य न विषय समान है, मुनि मन छोभत ज्ञान । गति पामर जिव कौन है, मायावश अज्ञान ।।२१।। (स्वर्वेद चतुर्थ मण्डल षष्ठ अध्याय) ०४/०६/२१


**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
इंद्रियांचे विषय नशेसमान आहेत, ज्यामुळे जीवाला आत्मज्ञानाची विस्मृती होते. यामुळेच स्थिर बुद्धी असणाऱ्या मुनी जनांचे ज्ञानही चंचल होऊन जाते आणि ते विषयांच्या आवेगाने दुःखी होतात. अज्ञानामुळे माया विषय-मायेच्या वशीभूत होऊन हा जीव अधोगतीला प्राप्त होतो. म्हणून जन्म-मृत्यू चक्राच्या दुःखास प्राप्त होणारा जीव आहे.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## काव्य-चरितावली



पुष्प १५वे

आधुनिक केसरी

काव्यपुष्प-१५ वे-।। शोधात श्रीगुरूंच्या ।।
श्रीमहाराजांच्या मना-शरीरा नसे विश्रांती
श्रीगुरूंच्या शोधात चालू हो त्यांची भ्रमंती
शोधात श्रीगुरूंच्या ते कलकत्त्याला आले
तिथे श्रीमहाराजांना श्रीरामकृष्ण भेटले ।।
श्रीगुरू शोधार्थची श्रीमहाराजांची फिरती
अजूनही अखंड सुरूच ती राहिली
वाटे त्यांना "आपला श्रीगुरु वेगळाच आहे
इतके फिरलो , तरी अजुनी ना गुरु भेटले ।।
श्रीसमर्थसंप्रदायी सत्पुरुष श्रीरामकृष्ण
महाराजांची भेट होता ते म्हणाले -बाळ,
येहळेगावच्या तुकारामचैत्यनाकडे जा
तुझे रे काम होईल.....।।
म्हणे कवी अरूणदास-आनंद मोठाच हा
श्रीगुरुभेट वर्णन लिहिण्याचे भाग्य लाभले ।।




अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

## नामस्मरणापरते दुसरे हित नाही

आधुनिक केसरी

एक गृहस्थ मला भेटले. ते म्हणाले, “मला देव पाहावासा वाटतो. तुम्ही पाहिला आहे का ?”मी म्हटले, “पाहिला आहे.” त्यांनी विचारले, “तो मला दिसेल का ?” मी म्हटले, “दिसेल, पण या डोळ्यांनी दिसणार नाही. देवाला पाहण्याची दृष्टी वेगळी आहे.” आज आमची विषयाची दृष्टि आहे. ती भगवंताची नाही. आपल्याला भगवंत पाहायचा असेल तर त्याला एकच उपाय : भगवंताच्या नामात राहावे. नामाशिवाय दुसरा मार्ग नाही. सगळ्यांना माझे सांगणे आहे; हे ऐकणे अत्यंत जरूर आहे. बरे ! ऐकणे कशासाठी ? तर मी बरोबर मार्गाने जातो आहे की नाही, ते कळण्यासाठी. पण नुसते ऐकून चालणार नाही; ऐकून कृती केली तरच साधेल. ती तुम्ही करा. आचरणात आणलेले तेवढेच कामाला येईल. सगळ्यांनी नामस्मरण करा. नामस्मरणासारखा कल्याणाचा दुसरा मार्ग नाही. जे सहज आपल्याजवळ आहे, अत्यंत उपाधिरहित आहे, जे कुणावर अवलंबून नाही, असे जर काही असेल तर ते भगवंताचे नाम आहे. तेव्हा शुद्धतेने, शुद्ध आचरणाने जो ते घेईल, त्याचे राम खरेच कल्याण करील.

आपल्या गुरूने जे सांगितले ते सत्य मानावे. या मार्गाने शंभर पावले गेलास तर खजिना सापडेल.’ असे गुरूने सांगितले, तर दुसऱ्या मार्गाने दोनशे पावले जरी गेला तरी



त्याचा काय उपयोग ? ‘मला सगुण साक्षात्कार व्हावा’ असे म्हणतो, पण प्रत्यक्ष बोलणारा चालणारा सद्गुरू पाहून समाधान होत नाही तर परमात्म्याचे दर्शन करून देऊन काय उपयोग ? आंबा हवा असेल तर कोय पेरल्याशिवाय कुठला मिळणार ? सद्गुरूने जे सांगितले त्यापरते माझे काही हित आहे, हे मनातच येऊ नये. आपण खरोखरी सर्वस्वी त्याचे व्हावे. नामस्मरणापरते दुसरे हित नाही. माझ्या नामाने घरात आजारी पडलेला मनुष्य बरा व्हावा म्हणणे, म्हणजे त्या नामाचा विषयाकडे उपयोग नाही का केला ? बरे झाल्यावर ज्याप्रमाणे आम्ही बाटलीतले औषध टाकून देतो, त्याप्रमाणे गरज संपली की आम्ही देवाला विसरतो. अमुक एक घडावे असे जिथे वाटते तिथे साधनात कमतरता आली.

एका सद्गुरुवचनावर विश्वास ठेवला म्हणजे सुखदुःखाच्या गोष्टींचा मनावर परिणाम होत नाही. मोठा अधिकारी झाला तरी पोराबाळांबरोबर खेळताना ज्याप्रमाणे तो त्यांच्यासारखा होतो, त्याप्रमाणे व्यवहारात वागावे. आपण निर्लोभतेने वागावे. खेळात ज्याप्रमाणे आपण चुकू देत नाही, त्याप्रमाणे प्रपंचात करावे. प्रपंचाचा सहवास वरवरचा असावा. त्याचा वास आत नसावा. आत फक्त भगवंताचा वास असावा.

**आजचे बोधवचन आहे- गुरूचरणी अत्यंत विश्वास । आणि साधनाचा अखंड सहवास । येथे प्रपंचाचा सुटला फास । हाच परमार्थाचा मार्ग आहे खास ॥ श्रीराम समर्थ**

## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

नातळे चांडाळ । त्याचा अंतरीं विटाळ ॥२॥
ज्याचा संग चित्तीं । तुका म्हणे तो त्या याती ॥३॥
तेलनीशीं रुसला वेडा । रागें कोरडें खातो भिडा ॥१॥
आपुलें हित आपण पाही । संकोच तो न धरी कांहीं ॥ध्रु.॥
नावडे लोकां टाकिला गोहो । बोडिले डोकें सांडिला मोहो ॥२॥
शेजारणीच्या गेली रागें । कुत्र्यांनी घर भरिलें मागें ॥३॥

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
गुरुवार, २३ फेब्रुवारी २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari



१८१ दिवस
मुदत ठेवीवर मिळवा
11% व्याजदर
* नियम व अटी लागू
टोल-फ्री : 18004197501 rajasthanimultistate.in

राजस्थानी मल्टीस्टेट
कार्यक्षेत्र महाराष्ट्र-कर्नाटक
राजस्थानी मल्टीस्टेट
को-ऑप. क्रेडीट सो.लि., परळी वैजनाथ
बँकींग • आरोग्य • शिक्षण • रियल ईस्टेट • इन्शुरन्स
चंदुलाल बियाणी
चेअरमन

कार्यरत शाखा :

| | |
|---|---|
| **मुख्य कार्यालय व शाखा :** मोंढा मार्केट, परळी वैजनाथ, जि. बीड. | 9130072178/88 |
| **पंचशिल नगर शाखा :** विद्यानगर जलालपूर रोड, पंचशिल नगर, परळी वैजनाथ, जि. बीड. | 9130072809 |
| **मुख्य शाखा विस्तारित कक्ष :** ऊर्जा प्लाझा, गणेशपार रोड, परळी वैजनाथ, जि. बीड. | 9130072181 |
| **पंचशिल नगर शाखा विस्तारित कक्ष-१ :** दिगंबर कॉम्प्लेक्स, नेहरू चौक (तळ), परळी वैजनाथ, जि. बीड. | 9130072180 |
| **पंचशिल नगर शाखा विस्तारित कक्ष-२** उड्डान पुला जवळ, शिवाजी नगर, परळी वैजनाथ, जि. बीड. | 9130072805 |
| **सिरसाळा शाखा :** बड़े निवास, जुने बस स्टँड रोड, सिरसाळा, ता. परळी वैजनाथ, जि. बीड. | 9130072184 |
| **अंबाजोगाई शाखा:** प्रशांत नगर, बस स्टॅण्डच्या मागे, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. | 9130072183 |
| **विस्तारीत कक्ष अंबाजोगाई-१ :** मोहन कॉम्प्लेक्स, मेनरोड, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. | 9130072802 |
| **विस्तारीत कक्ष अंबाजोगाई-२** घाटनांदुर, मेनरोड, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. | 9130072808 |
| **बीड शाखा :** जिजामाता चौक, मोंढा रोड, ता. जि. बीड. | 9130072221 |
| **सोनपेठ शाखा :** स्नेह सदन, विटा रोड, सोनपेठ, ता. सोनपेठ, जि. परभणी. | 9130072186 |
| **गंगाखेड शाखा :** डॉक्टर लेन, एच.डी.एफ.सी. बँकेसमोर, गंगाखेड, जि. परभणी. | 9130072807 |
| **विभागीय कार्यालय व महेश नगर शाखा :** अपना बजार २०४ २०६, आकाशवाणी जवळ, औरंगाबाद | 9130072176 / 77 |
| **राजा बजार शाखा :** बालाजी मंदिर समोर, राजा बजार, शहागंज, मोंढा, ता. जि. औरंगाबाद. | 9130072022 |
| **माळीवाडा विस्तारीत कक्ष :** नाशिक रोड, माळीवाडा, ता. जि. औरंगाबाद. | 9130072803 |
| **अंबड शाखा:** जालना-बीड रोड, महावीर चौक, आंबड, जि. जालना. | 9130072804 |
| **जालना शाखा :** मेन बस स्टँड रोड, जालना, ता. जि. जालना. | 9130072806 |
| **जालना विस्तारीत कक्ष-१ :** जांगडे कॉम्प्लेक्स, जालना-अंबड रोड, ता. जि. जालना. | 9130072226 |
| **नांदेड विस्तारीत कक्ष :** पहिला मजला, गुरूकृपा मार्केट, महावीर चौक, ता. जि. नांदेड. | 9130003070 |
| **उदगीर विस्तारीत कक्ष :** पहिला मजला, लासूणे कॉम्प्लेक्स, देगलूर रोड, उदगीर, जि. लातूर. | 9130072190 |
| **टोकवाडी विस्तारीत कक्ष:** परळी-बीड रोड, टोकवाडी, ता. परळी वैजनाथ, जि. बीड. | 9130072224 |
| **दिंद्रुड विस्तारीत कक्ष :** शेप कॉम्प्लेक्स, परळी-बीड रोड, दिंद्रुड, ता. माजलगाव, जि. बीड. | 9130002070 |
| **लातूर विस्तारीत कक्ष** : कव्हा रोड, शिवनेरी गेट जवळ, लातूर | 9130002070 |
| **औराद विस्तारीत कक्ष :** मेन रोड, कृष्णा ऑईल मिल समोर, औराद शहाजनी, ता. निलंगा, जि. लातूर. | 9130003044 |
| **बीड विस्तारीत कक्ष :** मोंढा मार्केट, संतोषी माता मंदिर समोर, बीड, ता.जि. बीड. | 9130072221 |
| **उमरगा शाखा :** शिवाजी महाविद्यालय जवळ, बालाजी नगर, मेन रोड, उमरगा, जि. उस्मानाबाद. | |
| **परभणी शाखा:** कापसे भवन, कच्छी बजार, सरदार वल्लभभाई पटेल रोड, परभणी. | |
| **अहमदनगर शाखा:** शॉप नं. ३ व ४ बेसमेंट, मोरया कॉर्नर, मोरया मंगल कार्यालय, पाईपलाईन रोड, अहमदनगर. | |
| **केज शाखा :** वकीलवाडी, कानडी रोड, केज, ता. केज. जि. बीड. | |
| **माजलगाव शाखा :** गाळा क्र.८, सिद्धेश्वर कॉम्प्लेक्स, गढी कॉर्नर, गढी रोड, माजलगाव, ता. माजलगाव, जि. बीड. | |

**नियोजित शाखा :** धर्माबाद, उमरखेड, नाशिक, पंढरपूर, रेणापूर, पुणे, अकोला

कॉर्पोरेट ऑफिस : २०५,२०६, बिल्डिंग नं. २, पहिला मजला, अपना बाजार, जालना रोड, औरंगाबाद . मो. 9130072176, 9130072177



# शहर सजावट करणाऱ्या कलाकारांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** छत्रपती संभाजीनगरात दि.26 व 27 फेब्रुवारी 2023 रोजी G-20 परिषदेच्या सदस्यांची बैठक होणार आहे. त्या अनुषंगाने शहराचे रस्ते, चौक , उड्डाणपूल इ.ठिकाणी स्वच्छता, चित्रकला, रंगरंगोटी, विद्युत रोषणाई इ.सजावटीचे काम करणाऱ्या कलाकार व कामगारांचा भारतीय जनता पार्टी छत्रपती संभाजीनगरतर्फे शहर-जिल्हा अध्यक्ष श्री शिरीषजी बोराळकर यांच्या मार्गदर्शनाखाली दि.22-2-2023 बुधवार रोजी सिडको उड्डाणंपुल येथे काम करत असलेल्या कलाकारांची भेट घेऊन त्यांच्या सत्कार करण्यात आला आला.

राज्याच्या विविध भागातील कलाकार संभाजीनगर शहरात येऊन रात्रंदिवस मेहनत करून आपले शहर सजावण्यात या कलाकारांनी महत्वाची भूमिका बजावली आहे शहरात फिरताना सजलेले शहर बघून निश्चितच शहर वासिय आनंदून जातात कलाकारांनी घेतलेल्या अथक परिश्रमामुळेच हे शक्य झाले. त्या मुळे त्यांचा सत्कार करावा ही कल्पना कामगार मोर्चाचे अध्यक्ष हाफिज शेख यांना सुचली व भाजपा शहर अध्यक्ष श्री शिरीष बोराळकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला. या वेळी दादाराव तुपे फुलंब्री तालुका अध्यक्ष भाजपा कामगार मोर्चा, कचरू घोडके, साहेबराव निकम, राहुल नरोटे, दीपक खोतकर, विकास कुलकर्णी, अरविंद डोणगावकर, मनीषा भंसाळी, मनीषा मुंडे, दीपक बनकर, सिद्धार्थ साळवे, सुनील तुपे, शेख सलीम, रीता पारीख, ज्योती हापसे, संगीता जाधव, पुष्पा बनकर, जयश्री वाडेकर, संगीता कांबळे, अंजुषा जैन, करुणा पाईकडे, मच्छिंद्र मात्रे, शेख मुनीर, संतोष संत्रे, नितीन पानसरे, लक्ष्मण निकम, वैजनाथ वाघमारे विष्णू घोडके राज बुंदिले, विठ्ठल गायकवाड, अजिंक्य कुलकर्णी, शेख मोमीन व कामगार मोर्चाचे सर्व पदाधिकारी उपस्थिती होते.

## जाचाला कंटाळून विवाहितेची आत्महत्या

आधुनिक केसरी न्यूज



**पंढरपूर :** तालुक्यातील उपरी येथील शीतल नवनाथ नागणे राहणार नागणे वस्ती उपरी तालुका पंढरपूर या विवाहितेचा मृतदेह विहरीत आढळून आला होता.या प्रकरणी मयत शीतल यांचे भाऊ गणेश प्रल्हाद आसबे राहणार खरसोळी तालुका पंढरपूर यांनी पंढरपूर ग्रामीण पोलीस ठाण्यात दाखल केलेल्या फिर्यादी नुसार मयत शीतल यांचे लग्न उपरी येथील नवनाथ नागणे यांच्या समवेत ५१ हजार रुपये हुंडा व अडीच तोळे देत १५ एप्रिल २०१२ रोजी झाले होते. लग्नानंतर मयत शीतल यांचा मागील ३ वर्षांपासून पती नवनाथ हा तिचे सासू सासरे यांच्या सांगण्यावरून मारहाण करीत छळ करीत होता.पती नवनाथ याने दोन तोळे सोन्याचा आहेर पाहिजे असा तगादा लावला होता.त्याच बरोबर पिकअप ची मागणीही केली जात होती.सदर मागणी पूर्ण न केल्याने मयत शीतल यांचा छळ केला जात होता अशी माहिती फिर्यादी गणेश आसबे तसेच मयत शीतलच्या आईने दिली आहे.तर या प्रकरणी आरोपी विरोधात ४९८ सह भादंविच्या विविध कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती पोलीस निरीक्षक धनंजय जाधव यांनी दिली आहे.



## महाशिवरात्रीनिमित्त श्री महाकाल प्रतिष्ठानतर्फे महारक्तादान

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** महाशिवरात्रीनिमित्त आयोजित श्री महाकाल प्रतिष्ठानतर्फे महा रक्तदान शिबीर बाळकृष्णनगर गारखेडा अध्यक्ष अथर्व भाई कोठेकर, उप अध्यक्ष यश काळे, ओमकार वाघमारे, यश माळेकर, विक्रम सोलंकी, ओमकार पवार, निशांत नागरे, विनायक कसबेकर, बसवराज पाटील, निलेश आंधळे, वैभव काटे, यश अबिल्वादे, निसर्ग राठोड विशेष आरोग्य कर्मचारी भालेराव रक्तपेढी राहुल राठोड 'आरती वामने 'शितल पवार ' ललिता नांदरक, मार्गदर्शक श्री बालकृष्ण शेवंते सर व महाराष्ट्र राज्य पत्र विक्रेता संघटना जिल्हा सदस्य शिवाजी ढेपले आदी उपस्थित होते.

## नाराजीनाट्याचा अहवाल लिफाफाबंद

आधुनिक केसरी

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्याविरोधात लिहिलेल्या पत्रानंतर उघड झालेल्या काँग्रेसमधील नाराजी नाट्यासंदर्भातील अहवाल अखेर लिफाफाबंद करण्यात आला. यासंदर्भात काँग्रेसचे वरिष्ठ नेते रमेश चेन्निथला यांनी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या अनेक पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून हा अहवाल अंतिम केला. तो २६ फेब्रुवारीला रायपूर येथे होणाऱ्या काँग्रेसच्या राष्ट्रीय अधिवेशनात सादर करण्यात येणार आहे. दरम्यान, या अहवालामध्ये आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी अनेक बदल सूचविण्यात आल्याची माहिती सूत्रांकडून समजते. नाशिक पदवीधर मतदारसंघातील निवडणुकीत महाराष्ट्र युवक काँग्रेसचे माजी अध्यक्ष सत्यजित तांबे यांनी बंडखोरीनंतर प्रदेशाध्यक्षांवर आरोप केले. काँग्रेसचे विधिमंडळातील नेते बाळासाहेब थोरात यांनीही पक्षश्रेष्ठींकडे नाराजी मांडणारे पत्र पाठवले. यामुळे महाराष्ट्र काँग्रेसमधील अंतर्गत गटबाजी चव्हाट्यावर आली. या सगळ्याची गंभीर दखल घेत दिल्लीतील पक्षश्रेष्ठींनी रमेश चेन्निथला यांची याप्रकरणाच्या चौकशीसाठी नियुक्ती केली. त्यांना याबाबत अहवाल सादर करण्याचे आदेशही दिले. त्यानुसार चेन्निथला तीन दिवसांपासून मुंबईच्या दौऱ्यावर होते. या दौऱ्यात त्यांनी काँग्रेसचे माजी मंत्री, प्रदेश कार्यकारिणी सदस्य, आमदार, खासदार यांच्या भेटी घेतल्या. दादरच्या टिळक भवनामध्ये सोमवारी त्यांनी अनेकांची मते जाणून घेतली. मंगळवारी नरिमन पॉईंट येथील हॉटेलमध्येही अनेकांच्या भेटी घेतल्या. त्यामध्ये जेष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांचा समावेश होता. बाळासाहेब थोरात यांनीही चेन्निथला यांची येथेच भेट घेतल्याची माहिती हाती आली आहे. दरम्यान, महाराष्ट्रातील पक्ष संघटन मजबूत आहे. आगामी निवडणुकीला प्रदेश कार्यकारिणी खंबीरपणे सामोरे जाईल, असा विश्वास चेन्निथला यांनी मंगळवारी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केला. रायपूर येथे २६ फेब्रुवारी रोजी काँग्रेसचे अधिवेशन आहे. त्यावेळी ते आपला अहवाल सादर करतील, असे सूत्रांकडून सांगण्यात येत आहे. या अहवालात त्यांनी प्रदेश काँग्रेस अध्यक्षांबाबत काही सूचना केल्याची माहिती समोर आली आहे. तसेच आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या महाराष्ट्रातील निवडणुकांविषयीचे पक्षाचे नियोजन अहवालात मांडतील, अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे.

## कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे दुधारी शस्त्र



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**मानवी सभ्यतेच्या इतिहासात अशा काही गोष्टींचा शोध लागला की ज्याने मानवाची जगण्याची पद्धतच बदलून गेली. सर्वप्रथम हजारो वर्षांपूर्वी लागलेल्या आग आणि चाकाच्या शोधाचे नाव घेतले जाते. यानंतर औद्योगिक क्रांती म्हणजेच यंत्रयुग आले. सुमारे पन्नास वर्षांपूर्वी जन्माला आलेल्या इंटरनेटकडे अशा पद्धतीने पाहिले जात होते की पुढच्या शतकांपर्यंत यापेक्षा मोठा शोध लागणार नाही. पण कदाचित तंत्रज्ञानाचा सर्वात मोठा गुण म्हणजे तो आपल्या गरजेनुसार बदलतो. इंटरनेटच्या सध्याच्या युगात हे बदल खूप वेगाने होत आहेत. याची सर्वात अलीकडील उदाहरणे म्हणजे 'चॅटजीपीटी' नावाचे आणि त्यानंतर लगेचच अल्फाबेट (गुगल) द्वारे 'बार्ड' नावाच्या दोन कृत्रिम बुद्धिमत्ता प्लॅटफॉर्मने जगभरात खळबळ उडवून दिली आहे.**

याविषयी निर्माण झालेल्या सनसनाटीने एकीकडे जिथे आता मौलिकतेची किंमत काय राहिल या गोष्टीशी संबंधित आहे, कारण त्यांच्यामुळे कॉपी करणे सोपे आणि पकडणे कठीण झाले आहे. दुसरीकडे, तंत्रज्ञान (कृत्रिम बुद्धिमत्ता) मानवांवर मात करू शकते किंवा कृत्रिम बुद्धिमत्तेने सुसज्ज मशीन आपल्याला त्यांचे गुलाम बनवू शकतात अशी चिंता आहे. या चिंतेचा तात्काळ संदर्भ म्हणजे सॅन फ्रान्सिस्कोस्थित आर्टिफिशियल इंटेलिजन्स रिसर्च कंपनी ओपनएआयने विकसित केलेला चॅटजीपीटी नावाचा चॅटबॉट (आर्टिफिशियल इंटेलिजन्स रोबोटचा एक प्रकार), जो तीन महिन्यांपूर्वी 30 नोव्हेंबर 2022 रोजी प्रारंभिक स्वरूपात (प्रोटोटाइप म्हणून) सादर करण्यात आला होता. चॅटजीपीटी (CHATGPT) या इंग्रजी शब्दाचे पूर्ण नाव चॅट जेनरेटिव प्रिट्रेंड ट्रांसफार्मर ( CHAT GENERATIVE PRETREND TRANSFORMER) आहे.

'सर्च इंजिन' गुगलच्या पलीकडे जाऊन विचारलेल्या प्रश्नांची मूळ उत्तरे देणे हा त्याचा उद्देश आहे. त्याच्या अनेक फायद्यांपैकी एक म्हणजे तो प्रश्नांची उत्तरे प्रत्येक वेळी नवीन शैलीत आणि अधिक तपशीलवार देतो, ज्यामुळे ते मूळ वाटतात आणि जणू ते वेगवेगळ्या लोकांनी दिले आहेत. वास्तविक इंटरनेट इत्यादींवरून घेतलेल्या प्रचंड डेटापासून प्रशिक्षित केलेल्या CHATGPT ची शैली शिकण्याची प्रवृत्ती आणि ते मानवी शैलीत विकसित करणे आहे. जेव्हा एखादा प्रश्न विचारला जातो तेव्हा मानवाला काय अपेक्षित आहे तसे उत्तर देण्याचे प्रशिक्षण दिले गेले आहे. एवढेच नाही तर CHATGPT हा कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) क्षमतेने सुसज्ज असलेल्या सामान्य रोबोटपेक्षा वेगळा आहे कारण तो विचारलेल्या प्रश्नांमधील मानवी हेतू समजून घेतो आणि वास्तविकतेच्या जवळ जाणारी उत्तरे देतो. ही उत्तरे लेखासारख्या सामग्रीच्या स्वरूपात असू शकतात, मात्र गुगलवर जसे उत्तरात सुचवलेल्या असंख्य वेबसाइट्स येतात तसे नाही.

काही प्रश्नांची उत्तरे देण्याऐवजी, CHATGPT प्रति-प्रश्न उभे करू शकते आणि प्रश्नाचे काही भाग काढूनही टाकू शकते जे त्याला समजत नाही. काही प्रकरणांमध्ये CHATGPT चुकीची किंवा अपूर्ण तथ्ये प्रदान करते. याचे कारण सध्या मार्च 2022 पर्यंतच्या माहितीच्या आधारे डेटा भरण्यात आला आहे. त्यात नवीन डेटा टाकण्याची प्रक्रिया म्हणजे एक प्रकारे चॅटबॉटचे प्रशिक्षणच आहे. तथापि, गुगल इत्यादी शोध इंजिने बऱ्याच काळापासून आपापल्या प्रमाणे



कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित प्रमुख शब्द (कीवर्ड), कुतूहल आणि प्रश्न सोडवत आहेत. परंतु GOOGLE कडून मिळालेल्या माहितीची एक मोठी मर्यादा ही आहे की सादरीकरणाच्या आधारावर त्यांना मूळ म्हणता येणार नाही.ते एकप्रकारचे असतात, म्हणून जर चार लोकांनी समान प्रश्न गुगलला विचारला तर ते एक समान असल्याकारणाने पकडले जाऊ शकतात. तसेच, भाषांतराच्या बाबतीत, 'गुगल ट्रान्सलेट' भाषेच्या खोल अर्थाचा अंदाज लावू शकत नाही. CHATGPT मध्ये या समस्या दूर करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले गेले आहेत.

जी-मेलचे जनक पॉल बुशिट यांनी त्याचे कौतुक करताना गुगलच्या अस्तित्वाला सर्वात मोठा धोका असल्याचे म्हटले आहे. पाल म्हणाले होते की आर्टिफिशियल इंटेलिजन्सवर आधारित चॅटजीपीटी सर्च इंजिनचे 'रिझल्ट पेज' काढून टाकेल. CHATGPT लेखन, पत्रकारिता, माहिती तंत्रज्ञान (IT) यासह डझनभर नोकऱ्या गमावण्याचा आणि शाळा आणि महाविद्यालयांमध्ये निबंध, कविता, लेख, शोधनिबंध, पुस्तके इत्यादींमधील विद्यार्थ्यांच्या मौलिकतेला ग्रहण लागेल असा दावा केला जात आहे. म्हणजेच विज्ञानाचे एक यश, ज्याला खरे तर क्रांतीच मानायला हवी, त्याबद्दल जग इतके भयभीत झाले आहे की, त्यावर बंदी घालण्याचे मार्ग शोधले जात आहेत. अमेरिकेतील काही विद्यापीठांनी चॅटजीपीटीच्या वापरावर बंदी घातली आहे. न्यूयॉर्क आणि सिएटलमधील काही विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये, विद्यार्थी त्यांच्या स्मार्टफोन, लॅपटॉप आणि सर्व्हरशी कनेक्ट केलेल्या संगणकांवर CHATGPT उघडू शकत नाहीत.

मात्र, इकडे चॅटजीपीटीचे आव्हान पाहून गुगलनेही 'बार्ड' नावाचा चॅटबॉट सुरू केला आहे. परंतु सुरुवातीच्या दिवसातच जेम्स वेब टेलिस्कोपबद्दलच्या प्रश्नाचे चुकीचे उत्तर दिल्यानंतर GOOGLE ला तथ्यात्मक त्रुटीबद्दल माफी मागावी लागली, ज्यामुळे त्याच्या (कंपनी अल्फाबेट) शेअर्सच्या किमती एकाच दिवसात आठ टक्क्यांनी घसरल्या. हे खरे आहे की गुगलला या आव्हानांची फार पूर्वीपासून जाणीव होती. दोन वर्षांपूर्वी एका मुलाखतीत गुगलचे प्रमुख सुंदर पिचाई यांनी दावा केला होता की, येत्या पंचवीस वर्षांत दोन गोष्टींमध्ये क्रांती होणार आहे. पहिली कृत्रिम बुद्धिमत्ता आणि दुसरी क्वांटम कॉम्प्युटिंग. एआयचा प्रभाव आणि माणसांवर यंत्रांचे वर्चस्व यामुळे नोकऱ्या जाण्याचाही गंभीर प्रश्न आहे. वीस-पंचवीस वर्षांपूर्वी, असा दावा केला जात होता की संगणक, इंटरनेटचा विस्तार आणि गुगल सर्च इंजिन यांसारखे शोध मौलिकता नष्ट करतील आणि अनेक नोकऱ्यांचा काळ बनतील. पण विज्ञानाच्या या प्रगतीला शिव्याशाप देण्याचा प्रयत्न करणाऱ्यांनी या वैज्ञानिक आविष्कारांच्या आणि क्रांतींच्या बळावर काम सोपे होऊन नवीन रोजगार निर्माण झाल्याचे पाहिले आहे. म्हणूनच CHATGPT च्या शोधाबद्दल फारसे घाबरणे योग्य वाटत नाही. आज जगभरातील मशीन्स आपल्या आजूबाजूला आहेत, जी AI मुळे अनेक क्लिष्ट कामे शिकून मानवांपेक्षा आपले श्रेष्ठत्व सिद्ध करत आहेत. पण कोणत्याही संगणकीकृत कामात यंत्रे पुढे जाणे हे इतके धोकादायक मानले जात नव्हते, त्यामुळे यंत्रासमोर मानव छोटा असल्याचे सिद्ध झाले. खरा धोका नोकऱ्यांना आहे.

त्याचे एक सत्य हे आहे की जगभरातील अनेक कंपन्या वाढत्या मजुरीच्या किमती लक्षात घेऊन रोबोट्स आणि एआयने सुसज्ज असलेल्या मशीन्स आणि संगणकांना उत्पादनाचे बरेच काम सोपवत आहेत. भारतातही माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील 10% नोकऱ्या ऑटोमेशनमुळे नष्ट होण्याचा धोका आहे. शास्त्रज्ञ स्टीफन, प्रसिद्ध उद्योगपती इलॉन मस्क आणि मायक्रोसॉफ्टचे मालक बिल गेट्स यांनीही भविष्यात कारखान्यांमध्ये, घरांमध्ये आणि कार्यालयांमध्ये काम करणाऱ्या माणसांना मशीनद्वारे आव्हान दिले जाऊ शकते. मायक्रोसॉफ्ट सारख्या कंपन्या आणि इलॉन मस्क सारखे उद्योगपती 'ओपनएआय' प्रकल्पांमध्ये खूप पैसे गुंतवत आहेत जे बुद्धिमान मशीन तयार करतील हे ते काही विनाकारण करत नाहीत. मनुष्याने स्वतःला बुद्धिमान यंत्रापेक्षा अधिक हुशार सिद्ध केले नाही तर त्याच्या हातातील काम हिरावून घेतले जाणार आहे, हे चिन्ह स्पष्ट आहे.

## मुलांना फक्त पाठ्यपुस्तकात गुंतवून न ठेवता अष्टपैलू बनवा



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**मुलांचे भविष्य सुरक्षित व्हावं हि प्रत्येक पालकांची मनोमन इच्छा असते .हि पालकांची इच्छा अगदी रास्त असते .आपल जीवन अडचणी समस्या मध्ये गेलं किमान मुलांच्या वाट्याला हे सगळं न येता किमान मुलांच्या वाट्याला तरी सुख यावं हि त्या मागिल सुद्ध भावना असते .आपल्या मुलांना सुख मिळावं हि अपेक्षा ठेवुन पालक स्वतः प्रचंड मेहनत कष्ट करतात.मुलांच्या शैक्षणिक खर्चला पालक कुठेही कमी पडत नाहीत.मग पालक गरिब असो वा श्रीमंत आप आपल्या ऐपतीप्रमाणे मुलांच्या अडचणी सोडवतात. पालकांनची अहोरात्र धडपडत हि नुसती असुन चालणार नाही .तर पालकांच्या धडपडीला योग्य नियोजन व मुलांची प्रभावी साथ खुप आवश्यक आहे.**

मुलांना घडवत असताना फक्त पुसतकांच ओझं आणि त्या ओझ्याखाली दबलेली मुलं असंच कहिस समिकरण सध्या सचित्र आहे. यातुन योग्य मार्ग काढण थोडं जिकिरीचे असल तरी त्यातुन मार्ग काढत आपल्या मुलांना अष्टपैलू घडवलं पाहिजे. चिखलाचा गोळा जसा आकार देवु तसा घडतो. लहान मुलं ही जवळपास चिखलाच्या गोळ्या सारखीच असतात .आपण चिखलाच्या गोळ्याला आकार देताना घेतलेली मेहनत त्या मधुन तयार होणाऱ्या वस्तूंची दिव्यता निर्माण होते. तसंच लहानपणी बाल वयातील मुलांना त्यांच्यातील कलागुणांना ओळखुन आपण त्यांना सर्व संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. म्हणजे एखाद्या क्षेत्रातील त्यांचं दिव्यत्व आपोआप प्रकट होऊन ते यशोशिखरावर गाठतील. आपल्या मुलांच आयुष्य घडविण्यासाठी आपण त्यांना अष्टपैलू बनविण्याची आवश्यकता आहे . जेणेकरून मुलांच भविष्य सुरक्षित करण्यासाठी त्यांना अष्टपैलू व्यक्तिमत्त्व घडविणे गरजेचं आहे.लहान वयातच मुलांच्या मनातील प्रतिभा ओळखा त्यांना वाव द्या संधी द्या त्यांच्यावर विश्वास टाका आणि फक्त पुस्तकात गुंतवुन न ठेवता अष्टपैलू कस घडवता येईल कडे प्रामुख्याने लक्ष द्या मुलं अष्टपैलू होणे ही आजच्या युगाची खरी गरज आहे. प्रत्येक व्यक्ती मध्ये असंख्य कालगुण असतात आपण ज्या कलागुणांना वाव देवु संधी देऊ ते कलागुणा बळकट होण्यास सुरुवात होते व शेवटी त्या कलागुणांचे त्या क्षेत्रातील दिग्गजांत रूपांतर होते . म्हणून योग्य वेळी कालगुण ओळखुन संधी उपलब्ध करून दिली पाहिजे. मग क्षेत्र कोणतही असेल त्या क्षेत्रातील दिग्गज हा बालपणापासुनच घडत असतो . म्हणून आपल्या मुलांना बालपणापासून फक्त पुस्तकात न गुंतवता त्यांना अष्टपैलू व्यक्तिमत्त्व घडवा . शहरीकरण झपाट्याने वाढत आहे . त्याच प्रमाणात निसर्गाचं संतुलन दिवसेंदिवस बिघडत आहे त्याचे अनेक दुष्परिणाम मुलांच्या शारिरीक रचना व सामर्थ्यवर कोणत्याही परिस्थितीत होऊ नयेत तसेच नैसर्गिक प्रदुषणा मुळे निर्माण होणा-या शारिरीक समस्यांचा सामना करेल आशी शरिर



रचना मुंलाची व्हावी यासाठी त्यांना मुक्तपणे मैदानावर खेळु दिलं पाहिजे. त्याच बरोबर मुलांन मध्ये असणारी वेगवेगळी गुण कौशल्य प्रकट होण्यासाठी त्यांना बाल वयापासुन अष्टपैलू व्यक्तिमत्त्व घडविण्यासाठी संधी दिली पाहिजे. शिक्षणासोबतच मुलांना अष्टपैलू होण्यासाठी वाव देण अथवा तसं वातावरण उपलब्ध करून देणं पालक म्हणून आपलं कर्तव्य आहे. फक्त शाळा दप्तर पुस्तक अभ्याक्रम ,शिकवणी या पालिकडे सुद्धा वेगळं जग आहे .आणि त्या जगाचा मुक्त आनंद योग्य वयात मुलांना घेउ दिला पाहिजे . त्यासाठी मुलांना अष्टपैलू घडविणे आवश्यक आहे. दिवसेंदिवस बदलती जीवनशैली बदलती शिक्षण पद्धती ,वाढती लोकसंख्या या सह अनेक व्यक्तिगत तथा सार्वजनिक समस्या निर्माण होत आहेत या सगळ्या मध्ये आपली मुलं प्रत्येक पातळीवर प्रत्येक टप्प्यात टिकली पाहिजेत आणि टिकण हे काळाची गरज त्या साठी आपली मुलं प्रत्येक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांसाठी परफेक्ट असली पाहिजे त्यासाठी फक्त पुस्तकात न गुंतवुन ठेवता अष्टपैलू व्यक्तिमत्त्व घडवा. म्हणजे स्वतःच्या विकासा सोबतच राष्ट्र हितार्थ ती उपयोगी पडतील.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# सावळदबारा वि.वि.का.सोसायटीत सत्तार समर्थकांची वर्णी

## चेअरमनपदी मुकुंदा मानकर, दिनकर देशमुख तर व्हाचेअरमन वासुदेव कांडलेकर

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे विविध कार्यकारी सोसायटीच्या कृषी मंत्री अब्दुल सत्तार साहेब यांच्या समर्थकांची वर्णी लागली आहे.सावळदबारा येथील विविध कार्यकारी सोसायटीची पंचवार्षिक निवडणूकीचे शेतकरी पॅनल प्रमुख मो.लुखमान मो.शरीफ व शिवाआप्पा चोपडे यांच्या अध्यक्षतेखाली पॅनल उभे करण्यात आले होते.त्या सेवाभावी शेतकरी पॅनल चा आज दि.२०/२/२३ सोमवार रोजी भाजापाला पराभूत करून तेरा पैकीं तेराचा दणदणीत विजय झाला. उपस्थित सनमानिय सदस्य गण यांच्या उपस्थितीत विविध कार्यकारी सोसायटीच्या चेअरमन पदी मुंकुंदा मानकर,व दिनकर देशमुख तर व्हाचेअरमन पदी खांडेकर यांची मो.लुखमान मो.शरीफ व शिवाआप्पा चोपडे यांच्या हस्ते निवड करण्यात आली. उपस्थित विजयी संचालक मंडाळाचे सभासद गण अनुसयाबाई

मानकर, सुमनबाई खराटे, सपकाळ अरुण, सुरडकर नंदकिशोर, कुर्ली विजय, जाधव कन्हीराम तडवी सांडू, बावस्कर अनिल, राठोड तुकाराम,शेख हुसेन शेख अ.रहेमान व सर्व विविध कार्यकारी सोसायटीचे अधिकारी एस.के.गाजीलवाड,करतार चव्हाण, दिलीप रावणे साहेब व अधिकारी यांच्या उपस्थितीत बिनविरोध निवड करण्यात आली.उपस्थित ग्रामस्थ मान्यवरांनी मुकुंदा मानकर, दिनकर देशमुख व व्हाचेअरमन कांडलेकर यांच्या निवडी बद्दल शुभेच्छा देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला व पुढील वाटचालीच्या शुभेच्छा दिल्या.या निवडणुकी प्रकीयाला सपोनि भरत मोरे फर्दापूर यांच्या मार्गदर्शनाखाली सावळदबारा येथील बिट जमादार मिरखाॅ तडवी, आनंद पगारे,शिवदास गोपाळ यांनी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.अशी माहिती प्रा.मनोज चोपडे, पत्रकार गणेश खैरे व उपसरपंच मो.आरिफ मो.लुखमान यांनी जेष्ठ पत्रकार गोकुळसिंग राजपूत यांच्याशी बोलताना सांगितले.



# मातृभूमी कमांडो फोर्स तर्फे छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्सवात साजरी



आधुनिक केसरी न्यूज

**प्रिंपळा :** येथे दि १९ फेब्रुवारी २०२३ रोजी मातृभूमी फोर्सचे ऑफिस, प्रिंप्राळा ता. जि. जळगाव येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्सवात साजरी करण्यात आली . सदर कार्यक्रमात सर्व प्रथम सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती वर्षा पाटील मॅडम यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन करून पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन केले . त्या नंतर रेस्क्यू कमांडो फोर्स चे उत्तर महाराष्ट्र विभाग प्रमुख प्रदिप पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याबद्दल माहिती सांगून आपल्याला ही संपुर्ण महाराष्ट्र भरात मावळ्यांसारखे कमांडो उभे करून समाज सेवा देशसेवेचे ऋण फेडायचे आहे, असे अध्यक्षीय भाषणेत सांगितले. सदर कार्यक्रमात कमांडो योगेश महाले , कमांडो नितीन पाटील , कमांडो प्रतीक पवार , कमांडो पुजा भगत उपस्थित होते.

# जगताप भगिनीच्या विजयासाठी बंधुत्वाच्या नात्याने सरसावले पंढरपूर

आधुनिक केसरी न्यूज

**पंढरपूर :** चिंचवड विधानसभा मतदारसंघांचे लोकप्रतिनिधी आमदार स्व. लक्ष्मण जगताप यांच्या निधनाने रिक्त झालेल्या विधानसभा जागेची सध्या पोटनिवडणूक लागली आहे. सदर विधानसभा पोटनिवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टी व मित्रपक्षांच्या अधिकृत उमेदवार म्हणून श्रीमती आश्विनी जगताप या निवडणुकीस सामोरे जात आहेत. स्वर्गीय लक्ष्मण जगताप यांच्या निधनामुळे अतिशय संवेदनशील आणि भावनिक वातावरणामध्ये ही निवडणूक पार पडत आहे. राज्याच्या विधिमंडळ सभागृहामध्ये एक मार्गदर्शक व सहकारी म्हणून पंढरपूर मंगळवेढा विधानसभा कार्यक्षेत्राचे आमदार समाधान आवताडे यांना नेहमीच ज्यांची मोलाची साथ लाभली असे स्व. लक्ष्मण जगताप यांच्या पत्नी श्रीपती अश्विनी जगताप या निवडणुकीमध्ये उमेदवार आहेत. पंढरपूर - मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीमध्ये राजकीय जाणकारांची गणिते चुकीची ठरवून दिमाखदार विजय प्राप्त करणारे आमदार समाधान आवताडे हे श्रीमती आश्विनी जगताप या भगिनीसाठी पायाला भिंगरी लावून चिंचवड विधानसभा कार्यक्षेत्रामध्ये प्रचाराची राळ उठवत आहेत. देवभूमी आणि संतभूमी मतदारसंघाचा एक कर्तबगार लोकप्रतिनिधी पक्षाने दिलेल्या जबाबदारीला शिरसावंद्य मानून श्रीमती जगताप यांच्या विजयासाठी अहोरात्र झटत आहेत. सोलापूर जिल्ह्यातील व पंढरपूर - मंगळवेढा विधानसभा कार्यक्षेत्रातील अनेक नागरिक नोकरी, व्यवसाय व उच्च शिक्षणानिमित्त चिंचवड या विधानसभा कार्यक्षेत्रामध्ये वास्तव्यास आहेत. या सर्व मतदार नागरिकांना एका छताखाली संघटित करून आ. आवताडे त्यांच्या अडीअडचणी व समस्या जाणून घेत भारतीय जनता पार्टीची व्यापक ध्येय- धोरणे त्यांच्यापर्यंत पोहोचवण्यात आघाडीवर दिसत आहेत. पंढरपूर मंगळवेढा - विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणूक आखाड्यात मायबाप जनतेच्या मतदारारूपी आशीर्वादाने आमदार म्हणून जनतेच्या सेवेत रुजू झालेले आमदार समाधान आवताडे हे चिंचवड येथील एका भगिनीसाठी पुढे सरसावल्याने श्रीमती अश्विनी जगताप यांच्या विजयाचा वारू अधिक वेगाने पुढे पाऊल टाकत आहे. गोवा विधानसभा निवडणुकीमध्येही एका विधानसभा कार्यक्षेत्राची जबाबदारी यशस्वीपणे पेलणारे आमदार आवताडे हे भारतीय जनता पार्टीचे एक कुशल आणि संघटनात्मक लोकप्रतिनिधी व प्रचारक म्हणून आपली ओळख निर्माण करत आहे.एक ते दीड वर्षांमध्ये पंढरपूर आणि मंगळवेढा तालुक्याच्या धोरणात्मक प्रगतीसाठी आणि सर्वांगीण विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधीचा उपलब्धता करून सर्वसामान्य जनतेच्या विकासाचा परत जोमाने संक्रमित करणारी आमदार समाधान आवताडे यांच्या कार्यपद्धतीचे नेटके समीकरण चिंचवड विधानसभा क्षेत्रातील जनतेच्या पसंतीस उतरत आहे. आ. आवताडे यांच्या या सर्वसमावेशक प्रचार रणनीतीमुळे उमेदवार अश्विनी जगताप यांचा विजय जवळपास निश्चित झाला आहे.

# मंगळवेढ्यात तीन महिलांची दगडाने ठेचून हत्या; संशयिताला अटक

आधुनिक केसरी न्यूज

ज्योती खिलारे

**पंढरपूर :** मंगळवेढा तालुक्यातील नंदेश्वर येथे एकाच घरातील तीन महिलांची दगडाने ठेचून निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या तिहेरी हत्याकांडाच्या घटनेनंतर या परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झालं आहे.या हत्येप्रकरणी एका संशयिताला पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती आहे. नंदेश्वर येथील हॉटेल व्यावसायिक महादेव माळी यांच्या दोन बहिणी आणि सुनेची अज्ञात कारणाने दगडाने ठेचून हत्या झाल्याचे समोर आले आहे. महादेव माळी यांच्या मातोश्रीचे निधन काही दिवसापूर्वी झाले होते. यासाठी माळी यांच्या दोन विवाहित बहिणी शेतातील वस्तीवर राहण्यासाठी आल्या होत्या. दरम्यान महादेव माळी हे गावातील हॉटेलकडे तर त्यांचा मुलगा बंडू हा त्याच्या कापड दुकानाकडे गेल्यावर दुपारी हा धक्कादायक प्रकार घडल्याचे सांगितलं जात आहे. दुपारी १२ ते २ च्या दरम्यान मृतातील एक महिला बाहेर कपडे धुवत असताना तिच्यावर या अज्ञाताने दगडाने हल्ला केल्याचे सांगितले जातंय. नंतर दुसरी बहीण आणि सून पळून जात असताना त्यांच्यावरही हल्ला करून हत्या केल्याचं सांगितलं जातं. सुदैवाने या सुनेची चार महिन्याची मुलगी घरातच होती. मात्र या नराधमाला तिची माहिती नसल्याने ती यातून वाचली.

इतक्या क्रूरपणे झालेल्या या हत्याकांडामुळे हा परिसर हादरून गेला आहे. या घटनेची माहिती मिळताच मंगळवेढा येथील पोलिस उपाधीक्षक राजश्री पाटील, अतिरिक्त पोलीस अधीक्षक हिंमत जाधव, मंगळवेढ्याचे पोलीस निरीक्षक माने घटनास्थळी पोहोचले असून तपास सुरु केला आहे. या प्रकरणात शेजारीच राहणाऱ्या एका तरुणाला संशयित म्हणून पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याच्याकडे अधिकच तपास सुरु केला आहे. याबाबत अजून पोलिसांकडून कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नसली तरी यातील संशयित आरोपीपर्यंत पोलिस पोहोचल्याची विश्वसनीय सूत्रांनी माहिती दिली आहे.

महाराष्ट्र Business Katta












# मरेन तर देशासाठी; जगेन तरीही देशासाठीच !



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**भारतमातेला इंग्रजांपासून वाचविण्यासाठी राघोजी साळवे शहीद झाले. त्याच ठिकाणी क्रांतिवीर लहुजींनी दि.१७ नोव्हेंबर १८१७ला आपल्या वडिलांना श्रद्धांजली अर्पण केली. श्रद्धांजली अर्पण करतानाच त्यांनी "मरेन तर देशासाठी आणि जगेन तरीही देशासाठीच"अशी क्रांतिकारी प्रतिज्ञाही केली होती. त्यांनी अनेक देशभक्तांना आपल्यातील युद्धकला शिकवली. अशा महान क्रांतिगुरूची महती त्यांच्या स्मृतिदिनी श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी- अलककार वर्णन करीत आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यात लहुजींचे पूर्वज पराक्रम गाजवीत. साळवे घराणे सशस्त्र विद्येमध्ये निपुण व तरबेज होते. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या कार्यकाळात लहूजींच्या पूर्वजांना महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सोपविल्या होत्या. छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांच्या कार्यकाळात साळवे घराण्याची योग्यता ओळखून पुरंदर किल्ल्याच्या सरंक्षणाची जबाबदारी लहुजी साळवे यांच्या आजोबांकडे सोपवली होती.**

पुरंदर किल्ल्याच्या सरंक्षणासाठी साळवे घराण्यातील अनेक वीरपुरुषांनी आपल्या प्राणांची आहुती दिली होती. त्यांच्या उत्कृष्ट कामगिरींमुळे छत्रपती शिवाजी महाराजांनी लहुजींच्या पूर्वजांना राऊत या पदवीने गौरविले होते.

वस्ताद लहुजी राघोजी साळवे हे खरेतर लहुजी वस्ताद नावाने प्रसिद्ध आहेत. त्यांचा जन्म दि.१४ नोव्हेंबर १७९४ रोजी पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या पेठ या गावातील एका कुटुंबात झाला. मातंग समाजात जन्माला आलेल्या लहूजींना युद्धकलेचे प्रशिक्षण त्यांच्या घरातील वीर पुरुषांकडून मिळाले होते. लहूजींच्या वडिलांचे नाव राघोजी साळवे व आईचे नाव विठाबाई होते. लहूजी साळवे यांचे वडील राघोजी साळवे अतिशय पराकर्मी पुरुष होते. युद्ध कलेमध्ये त्यांचा कोणीही हात धरू शकत नसे. वाघाबरोबर लढाई करण्याच्या पराक्रमामुळे लहुजी साळवे यांचे वडील राघोजी साळवे त्याकाळी प्रसिद्ध होते. एकदा त्यांनी वाघाबरोबर युद्ध केले आणि जिवंत वाघाला खांद्यावर घेऊन पेशव्यांच्या राजदरबारी सादर केले होते. असे त्यांनी आपल्या प्रचंड शक्तीचे प्रदर्शन केले होते.

पुढे दि.५ नोव्हेंबर १८१७ला पेशव्यांचे इंग्रजांसोबत खडकी येथे तुंबळ युद्ध झाले. तब्बल १२ दिवसांपर्यंत राघोजी व २३ वर्षे वयाच्या लहुजी यांनी आपल्या मावळ्यांना सोबत घेऊन इंग्रजांविरुद्ध निकराचा लढा दिला. लहुजींचे वडील राघोजी साळवे वाऱ्याच्या वेगाप्रमाणे शत्रूवर तुटून पडले होते. ते तलवारीचे सपासप वार करत शत्रुंना जमिनीवर लोळवत होते. अखेर या संकटातून बाहेर पडण्यासाठी घाबरलेल्या इंग्रजांनी एकत्रित वार करून राघोजींना धारातीर्थी पाडले. राघोजी या युद्धात इंग्रजांच्या हातून लहुजींच्या समोरच शहीद झाले. त्यावेळी पेशव्यांचा पराभव झाला. पुढे इ.स.१८१८मध्ये मराठा साम्राज्याचा भगवा ध्वज शनिवारवाड्यावरून हटवून तेथे इंग्रजांचा युनियन जॅक फडकला. या पराभवाने लहुजींच्या हृदयात स्वातंत्र्यप्राप्तीची ज्वाला भडकली. स्वातंत्र्यप्रेम, देशभक्ती, देशप्रेम यांनी झपाटलेले लहुजी आपल्या वडिलांच्या मृत्यूच्या दुःखातून सावरले. आपल्या वडिलांना आपल्या डोळ्या देखतच शहीद झालेले पाहून त्यांच्या तळपायाची



आग मस्तकात गेली. भारतमातेला इंग्रजांपासून वाचविण्यासाठी राघोजी साळवे शहीद झाले. त्याच ठिकाणी क्रांतिवीर लहूजींनी दि.१७ नोव्हेंबर १८१७ला आपल्या वडिलांना श्रद्धांजली अर्पण केली. श्रद्धांजली अर्पण करतानाच त्यांनी "मरेन तर देशासाठी आणि जगेन तरीही देशासाठी" अशी क्रांतिकारी प्रतिज्ञाही केली होती. त्यांनी आपल्या वडिलांची समाधी उभारली. ही समाधी अजूनही पुणे-शिवाजी नगरजवळच्या वाकडेवाडी येथे आहे.

क्रांतिगुरू लहुजी हे दांडपट्टा चालवणे, तलवारबाजी, घोडेस्वारी, बंदूक चालवणे व निशाणेबाजी अशा सर्व युद्धकला कौशल्यांमध्ये निपुण होते. त्यांचे पिळदार शरीर व उभरलेली छाती पाहून शत्रूला सुद्धा घाम फुटत असे. जीवघेण्या शस्त्रांबरोबर ते अगदी एखाद्या खेळण्याप्रमाणे खेळत असत. आपल्या वडिलांचा मृत्यू व इंग्रजांनी केलेला पराभव त्यांना असह्य झाला. पराक्रमी घराण्यातील लहुजींनी इंग्रजांवर मात करण्यासाठी म्हणजे पर्यायाने देशाच्या स्वातंत्र्यासाठी मवाळपंथी नव्हे तर जहाल क्रांतिकारक निर्माण करण्याचे ठरविले. त्यासाठी त्यांनी आपल्या अंगी असलेले युद्धकलेचे शिक्षण तरुणांना देण्याचे ठरविले. म्हणून त्यांनी इ.स.१८२२मध्ये पुण्यातील रास्ता पेठ येथे देशातील पहिले युद्ध कलाकौशल्य तालीमकेंद्र उघडले. ते नाना रास्ते सरदार यांच्या हस्ते सुरू केले. या प्रशिक्षण केंद्रात सर्वच समाजांतील युवक तालीम घेण्यासाठी येऊ लागले. यात प्रामुख्याने बाळ गंगाधर टिळक, वासुदेव बळवंत फडके, महात्मा जोतीराव फुले, गोपाळ गणेश आगरकर, चापेकर बंधू, क्रांतिभाऊ खरे, क्रांतिवीर नाना दरबारे, रावबहाद्दूर सदाशिवराव गोवंडे, नाना मोरोजी, क्रांतिवीर मोरो विठ्ठल बाळवेकर, क्रांतिवीर नाना छत्रे, महात्मा जोतीराव फुलेंचे सहकारी वाळवेकर आणि परांजपे हे देखील लहुजी साळवे यांच्या आखाड्यातच शिकले. इ.स.१८४८ साली लहुजींच्या याच तालमीत सावित्रीमाई फुले यांची पहिली मुलींची शाळा सुरू झाली होती. म्हणून ते आद्य महाक्रांतिगुरू ठरतात, यात मुळीच शंका नाही.

दि.२० जुलै १८७९ रोजी इंग्रजांनी वासुदेव बळवंत फडके यांना देवरनावडगा मुक्कामी रात्री झोपेत असताना पकडले व त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला भरला. दि.७ नोव्हेंबर १८७९ रोजी वासुदेव फडके यांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. हे ऐकून लहुजींच्या मनावर खूप मोठा आघात झाला. अवघ्या तेरा महिन्यांनी म्हणजेच दि.१७ फेब्रुवारी १८८१ रोजी पुण्याच्या संगमपुराच्या परिसरात एका झोपडीवजा घरामध्ये लहुजी साळवेजींची प्राणज्योत मालवली. त्याबरोबरच एका महा क्रांतिपर्वाचा शेवट झाला. त्यांची समाधी पुण्यातील संगमवाडी येथे आहे.

# रोज निकलेगी बात फुलोंकी....

## || मंथनाचे पैलू ||





डॉ. धोंडोपंत मानवतकर
संपर्क क्र. 9890827414

लेखांक : ६

माणसाच्या जगण्याला आज बाजारू स्वरूप आले आहे. माणसाचे मूल्यच बाजारू झाले आहे. म्हणून माणूस आज कमालीचा उद्विग्न झालेला आहे.. या अवस्थेला राज्यकर्त्यांची ध्येयधोरणे आणि लोकसंख्येचा विस्फोट कारणीभूत आहे. या दोन्ही कारणामुळे सगळेच प्राणी, पशु, पक्षी असुरक्षित होत आहोत. प्रत्येक माणसाला वाटू लागले आहे की, आपल्याला सुरक्षित राहून चांगलं कसं जगता येईल. हा स्वार्थ आज सगळीकडेच पहायला मिळतोय !

स्वतःचं अस्तित्व, स्वतःची प्रतिष्ठा दाखवण्यासाठी व ती टिकवून ठेवण्यासाठी माणूस कमालीचा स्वार्थी बनलेला आहे. स्वतःच्या स्वार्थासाठी त्याने इतरांच्या भावनांचा विचार सोडून दिलेला आहे. त्याने स्वतःलाच जपण्याचा प्रयत्न चालू केलेला आहे. स्वतःमध्ये असलेला माणूसकी नावाचा घटक त्याने काढून टाकला आहे. म्हणजे माणूसकी, जिव्हाळा, नाते, मैत्री ह्या गोष्टी लवकरच कालबाह्य होतील. त्या काहीअंशी आजच संपुष्टात आलेल्या आहेत. माणूस भौतिक साधनांच्या आकर्षणात अडकून स्वतःचं आयुष्य कमी करत आहे. स्वतःला संपवून टाकत आहे. त्याच्या डोळ्यावर जगातल्या बेगडी आणि भौतिक आकर्षणाने स्वार्थाची पट्टी बांधलेली आहे. खरेतर संपूर्ण जगच विनाशाच्या दिशेने वाटचाल करत आहे. युक्रेनचे युद्ध वर्ष झाले सुरू असून लाखो निष्पाप जीवांचे नाहक बळी गेले आहेत, अनेकांचे संसार उध्वस्त झाले आहेत. अवघ्या चार तासाला एक सैनिक प्रदुषणाने मरतो आहे. आता पुन्हा हे युद्ध चिघळण्याचे संकेत आहेत.. म्हणजे एखाद्या माणसाच्या, पक्षाच्या सत्तेच्या केवळ स्वार्थामुळे देशातल्या, जगातल्या अनेक नैसर्गिक जीवांचे संसार धुळीला मिळताहेत, ही अवस्था अस्वस्थ करणारी आहे. जगातल्या स्वार्थी लोकांना अजून जगणं कळालेलंच नाही. त्यांनी जगणं समजूनही घेतलेलं नाही. आयुष्यात केवळ एकमेकांचा सूड घेण्यासाठी जगत आहेत. इतरांपेक्षा मी किती मोठा आहे, मी किती चांगला आहे हे दाखवण्यासाठी जगत आहेत. माणूस आपले चांगुलपण इतरांना दाखवून ते सिद्ध करण्यासाठी तो वेगवेगळे मनसुबे रचतोय. मॅनेज करून वेगवेगळे पुरस्कार घेतोय. यासाठी तो आपल्याच माणसांचा बळी घेतोय.! तो आपल्याच माणसाचा सूड घेतोय. तो सूड घेण्यासाठी जगतोय.! स्वार्थाचं, सूडाचं राजकारण करणं किंवा सूड घेणं म्हणजे जगणं नव्हे. एखाद्या पदासाठी वाट्टेल त्या थराला जाणं म्हणजे जगणं नव्हे. मनुष्यप्राण्याला गुलाम बनवून त्याचा छळ करणं म्हणजे जगणं नव्हे. आतंकवादी होणं आणि निष्पाप जीवांना मारणं म्हणजे जगणं नव्हे. चोऱ्या, खून, मारामाऱ्या, दरोडे, गरीबांची लूट करणं म्हणजे जगणं नव्हे... आयुष्य खूप सुंदर आहे; परंतु ते अनेकांना जगता येत नाही. ते फक्त संतांना, कलावंताना आणि विचारवंतांनाच जगता येतं; परंतु आजची शासनव्यवस्था कुणालाच सुखासमाधानाने जगू देत नाही. आणि तेही जगत नाहीत. सत्तेसाठी पदाच्या, पैशाच्या, धनाच्या मागे धावणारे लोक बेचैन असतात ही बेचैनी म्हणजे सुख नव्हे,"चैनसे जीने के लिए बेचैन मत बनिए और दुसरेंको भी मत बनाईए ! "

अलिकडच्या काळात प्रगतीच्या नावाखाली सत्ताधाऱ्यांनी देशातलाच नव्हे; जगातला माणूस बेचैन करून टाकला आहे. माणसाचं जगणं मुश्किल करून टाकलेलं आहे. आज सत्ताधाऱ्यांचा, राज्यकर्त्यांचा लवकर मोठ्ठं होण्याचा, संपत्ती कमविण्याचा, सत्ता गाजविण्याचा हव्यास शिगेला पोहोचलेला आहे..स्वतःच्या स्वार्थापोटी देशातल्या जनतेला वेठीस धरून छळ करणाऱ्यांना वाटते आपल्याला कधीच मरण नाही... म्हणून करताहेत कोट्यवधींचा भ्रष्टाचार, वेगवेगळ्या षडयंत्राने लोकांमध्ये फोडाफोडीचे राजकारण करून जगताहेत फक्त पाच-पन्नास वर्षे आणि मरताहेत लवकरच हर्टअटॅक येऊन.

सगळेच भ्रष्टाचारी लोक देशाला, राष्ट्राला, राज्याला आणि राज्यातील जनतेला बेईमान होऊन आणि बदनाम होऊनही आपण स्वतः कसे चारित्र्यवान आहोत याबाबतची घेतात क्लीनचीट. क्लीनचीट देणाराही असतो नासलेला,बदनाम झालेला..तरीही क्लीनचीट देण्याचा अधिकारही त्यालाच असतो...किती भ्रष्ट झालेली आहे ही सगळी व्यवस्था. हत्याकांड करणारे निर्दोष, भ्रष्टाचार करणारे निर्दोष, देशातल्या बँकांचे पैसे घेऊन बाहेर देशात जाऊन राहणारे निर्दोष. हत्या करणारे, जाळपोळ करणारे, गुंडगिरी करणारे राजरोसपणे फिरताहेत. निवडणुकीला ऐनवेळी पैसे वाटून निवडून येताहेत आणि जनतेचे नेते होऊन बसताहेत...अगदी गावपातळीपासून ते देशपातळीपर्यंत असंच चालू आहे.. तरीही त्यांच्याच नावाचा बोलबाला. मिडियावर रात्रंदिवस त्यांच्याच नावाच्या जाहिराती....लायकी नसलेले सुद्धा काही



राजकारणी लोक देश,राष्ट्र, राज्य, जिल्हा, गाव चालवताहेत. ही जनतेसाठी अत्यंत दुर्दैवी प्रक्रिया आहे..काही चांगले राजकारणी लोक सोडले तर अनेक धूर्त आणि बदमाशांचाच बोलबाला सुरू आहे. जनतेची इच्छा नसतानाही तो पहावा लागत आहे, ऐकावा लागत आहे. सर्व प्रकारचा मिडिया रोज मुर्खांचाच जप करतो आहे...म्हणून दिवंगत शायर मक़दूम मुहिउद्दीन आणि संगीतकार खय्याम साहब यांची माफी मागून मी त्यांच्या ग़ज़लेतल्या एका शेरात आलेल्या 'फुलोंकी' या रदीफचा इंग्रजीत असणाऱ्या FOOL या शब्दाचा अर्थ लावतो आहे ...रोज निकलेगी बात FOOLON की.. म्हणजे दररोज मुर्ख लोकांचेच कारनामे ऐकवले जाणार. देशातील कायदा आणि सुव्यवस्था बिघडवणाऱ्या अशा मुर्ख लोकांचे नावही आता ऐकण्याची ***मानसिकता राहिलेली नाही.***

***फिर छिडी रात बात फुलोंकी***
***रात है या बारात फुलोंकी..***
***आपका साथ साथ फुलोंका***
***आपकी बात बात फुलोंकी...***

मला भावलेली बागेश्री रागातील एक ग़ज़ल शायर मक़दूम मुहिउद्दीन यांची आहे. सरळ साधी रचना जीवनाचा फार मोठा अर्थ सांगणारी आहे. ही हिंदी-ऊर्दू मिश्रित ग़ज़ल प्रसिद्ध संगीतकार मोहम्मद ज़हुर खय्याम यांनी 'बाजार' (१९८२) या चित्रपटासाठी संगीतबद्ध केली होती. तलत अज़ीज़ आणि लता मंगेशकर यांच्या गोड स्वराने ती अजरामर झाली. 'उमराव ज़ान' सारख्या हिंदी चित्रपटांनी रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवलं ती सर्व गीते या चित्रपटाचा आत्मा आहेत, त्या गीतांना स्वरबद्ध करणारं ' खय्याम 'हे संगीत क्षेत्रातील एक मोठं नाव. शायर मक़दूम मुहिउद्दीन यांच्या ऊर्दू ग़ज़लेतून फुलांचा महिमा चित्रीत झालेला आहे. त्यांना या रचनेतून सांगावयाचं आहे की, फुलांचं आयुष्य हे एकाच दिवसाचं असतं.. तरी त्याचं नाजूक, कोमल, सुंदर, सुंगधी असणारं एकाच दिवसाचं आयुष्य माणसाला किती मोहित करतं. कसं मोहिनी घालतं. स्वतःकडे कसं आकर्षित करतं. असा गुण माणसाकडे का असू नये ? फुलांचं छोटंसं आयुष्य इतरांच्या आयुष्याला सुगंधी करून जातं. फुल हे सुंदर आयुष्याचं प्रतिक आहे, हे प्रतिक माणसासाठी खूप प्रेरणादायी,आशादायी, आणि गुणदर्शी आहे..म्हणून मनुष्य प्राण्यांनी फुलांचा गुण अंगिकारावा. फुलें ही झाडावरच चांगली दिसतात. ती तोडून दगडावर टाकू नयेत. अनेकांनी दगडाचा देव केलेला आहे त्या निर्जिव दगडावर माणसे फुले टाकतात, ही प्रक्रिया चुकीची आहे. कारण दगड, माणूस, फुले, झाडे, पाणी, डोंगर, दऱ्या, प्राणी,पशु,पक्षी हे सगळे निसर्गाचेच घटक आहेत. संत कबीर म्हणतात,

***"जत्रा में फतरा बिठाया***
***तीरथ बनाया पानी ||***
***दुनिया भई दिवानी***
***पैसोंकी धूलधानी ||***

संत कबिरांना सांगावयाचे आहे की, हे सर्व कर्मकांड चुकीचे आहे. संत कबीर आणि संत गाडगेबाबा यांनी कर्मकांड आणि अंधश्रद्धेला कडाडून विरोध केला होता. दगडाच्या देवाला नवस करून बकऱ्या कोंबड्याचे जीव घेणाऱ्या समाजाचं संत गाडगेबाबांनी दैनंदिन जीवनातील उदाहरणे देऊन प्रबोधन केले आहे. त्यांचा समाजप्रबोधनाचा सहज सोपा दससूत्री कार्यक्रम होता. १) भूखें को अन्न दो. २) प्यासें को पानी पिलाओ. ३) वस्त्रहीन लोगोंको वस्त्र दो. ४) गरीब बच्चोंकी शिक्षा में मदद करो, शिक्षा देनेमें योगदान दो. ५) बेघर लोगोंको आसरा दो. ६) अंधे, विकलांग, बिमार व्यक्तीकी सहाय्यता करो. ७) बेरोजगारोंको रोजगार दो. ८) पशु,पक्षी मूक प्राणियोंको अभयदान दो. ९) गरीब, कमजोर लोगोंके बच्चोकी शादीमें मदद करो. १०) दुःखी और निराश लोगोंको हिंमत दो.! यही सच्चा धर्म और सच्ची ईश्वरभक्ती है ! संत गाडगेबाबा यांनी त्यांच्या दससूत्री कार्यक्रमातून सहज सोप्या सरळ भाषेत खरा धर्म आणि खरी ईश्वरभक्ती सांगितली होती. ती सर्वसामान्य माणसांनी व शासनकर्त्यां लोकांनी समजून घेण्याची गरज आहे व आचरणात आणण्याची गरज आहे. संत गाडगेबाबांचा हा दससूत्री कार्यक्रम शासनाने राबवण्याची गरज आहे.. तो शासनाने राबवण्याचे आदेश काढावेत तरच संत गाडगेबाबा यांची जयंती साजरी केल्याचे सार्थक होईल.

# स्वच्छतेचे जनक संत गाडगे बाबा



भारत आ. बल्हाळ
संपर्क क्र. 7588819471

आधुनिक केसरी

**महाराष्ट्र राज्यास 'संताची भूमी' म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्र राज्यात अनेक थोर संत होऊन गेले आहेत संतानी नेहमी स्वतःच्या अगोदर समाजाचा विचार केला त्यासाठी त्यांनी त्रास सहन केला लोकांकडून त्यांचा छळ झाला. प्रचंड कष्ट घ्यावे लागले. अनेक समस्यांना तोंड द्यावे दिले; मात्र परोपकार हेच ध्येय मानलेल्या संतानी आपले कार्य नेटाने चालू ठेवले त्यापैकीच एक महान संत होऊन गेले ते म्हणजे संत गाडगे बाबा. संत गाडगे बाबा हे ओळखले जाणारे महाराष्ट्रातील समाजसुधारक कीर्तनकार होते. त्यांनी गरीब रहाणी स्विकारली होती. ते सामाजिक न्याय देण्यासाठी विविध गावांना भटकत असत. गाडगेबाबांना न्याय, सुधारणा आणि स्वच्छता या विषयात जास्त रुची होती.**

विसाव्या शतकातील समाजसुधारणेच्या चळवळीमध्ये ज्या महापुरुषांचा सहभाग आहे, त्यापैकी एक महत्वाचे नाव गाडगे बाबा यांचे आहे. संत गाडगे बाबा यांचे पूर्ण नाव डेबुजी झिंगराजी जानोरकर होते. संत गाडगे बाबा यांनी अज्ञान, अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी-परंपरा विरोध, कीर्तनाद्वारे जन-जागृती, समाज प्रबोधनावर आधारित भाषण, चोरी करू नका, कर्ज काढू नका, व्यसनाच्या अधीन होऊ नका, देवा-धर्माच्या नावाने प्राण्यांची हत्या करू नका, अस्पृश्यता पाळू नका असे जन-जागृती संदेश दिले. संत गाडगेबाबा हे चिंधे बुवा, लोटके महाराज, गाडगेबाबा या नावाने प्रसिद्ध होते. कीर्तनातून त्यांनी लोकजागृती केली. संत गाडगे बाबा महाराष्ट्र समाजाचे व्यासपीठ स्वच्छता, प्रामाणिकपणा यावर भर देत होते. देव दगड-धोंड्यात नसून माणसात आहे.

संत मालिकेतील थोर संत ज्ञानेश्वर होते. संत मालिकेचा पाया ज्ञानेश्वरांनी घातला. नामदेवांनी त्याचा भारतभर प्रचार केला. नाथांनी त्यावर इमारत बांधली व तुकाराम महाराजांनी त्यावर कळस चढविला. उरलेले कार्य गाडगेबाबांनी सिद्धीस नेले म्हणून संत गाडगे बाबा हे संत मालिकेतील 'शिरोमणी' म्हणून ओळखले जातात. मागील संतानी जो मार्ग दाखविला त्यावर चालण्याचे काम गाडगेबाबांनी केले.

समाजात धर्माच्या नावाखाली होत असलेला अन्याय, अत्याचार, अनीती, दूर करण्यासाठी ते जीवनाच्या शेवटच्या क्षणापर्यंत झगडले. त्यांनी पन्नास-साठ वर्षे महाराष्ट्राची निस्वार्थपणे सेवा केली.

संत गाडगे बाबा यांनी त्यांच्या काळात समाज प्रबोधनाबरोबरच राज्यातील प्रमुख शहरात व तीर्थक्षेत्री धर्मशाळा, आश्रमशाळा, नद्यांना घाट, पाणपोया, गोरक्षण, अंध अपंगासाठी सदावर्त, मुलांसाठी शाळा-कॉलेज व वसतिगृहे बांधून सर्वसामान्य जनतेची राहण्याची सोय केली. समाज प्रबोधनाबरोबरच त्यांची नवनिर्माणाचे भान असलेला एक युगप्रवर्तक 'वास्तुनिर्मितीकार' म्हणून नवी ओळख करून दिली.

गाडगे बाबा (जन्म :- शेंडगाव, २३ फेब्रुवारी १८७६; - अमरावती, २० डिसेंबर १९५६) हे गाडगे बाबा म्हणून ओळखले जाणारे महाराष्ट्र राज्यातील एक कीर्तनकार, संत आणि समा, जसुधारक होते. त्यांनी स्वेच्छेने गरीब रहाणी स्वीकारली होती. ते सामाजिक न्याय देण्यासाठी विविध गावांना भटकत असत. गाडगे महाराजांची सामाजिक न्याय, सुधारणा आणि स्वच्छता या विषयांत जास्त रुची होती. विसाव्या शतकातील समाजसुधार आंदोलनांमध्ये ज्या महापुरुषांचा सहभाग आहे, त्यापैकी एक महत्त्वाचे नाव गाडगे बाबा यांचे आहे.

संत गाडगे महाराजांचे पूर्ण नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर होते. त्यांच्या वडिलांचे नाव - झिंगराजी राणोजी जाणोरकर, तर आईचे नाव - सखुबाई झिंगराजी जानोरकर हे होते. गाडगे महाराज हे वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले समाजसुधारक होते. दीनदलित आणि पीडितांच्या सेवेमध्ये आपले संपूर्ण आयुष्य व्यतीत करणारे होते. त्यांच कीर्तन म्हणजे लोक प्रबोधनाचा एक भाग असे. आपल्या कीर्तनातून समाजातील दांभिकपणा रूढी परंपरा यावर ते टीका करत. समाजाला शिक्षणाचे महत्त्व पटवून देताना स्वच्छता आणि चारित्र्य याची शिकवण गाडगेबाबा देत.

गाडगे महाराज हे गोरगरीब, दीनदलित यांच्यामधील अज्ञान, अंधश्रद्धा, अस्वच्छता यांचे उच्चाटन करण्यासाठी कार्य करणारे समाजसुधारक होते. तीर्थी धोंडापाणी देव रोकडा सज्जनी |" असे सांगत दीन, दुबळे, अनाथ, अपंगांची सेवा करणारे थोर संत म्हणजे गाडगेबाबा. "देवळात जाऊ नका, मूर्तिपूजा करू नका, सावकाराचे कर्ज काढू नका, अडाणी राहू नका, पोथी-पुराणे, मंत्र-तंत्र, देवदेवस्की, चमत्कार असल्या गोष्टींवर विश्वास ठेवू नका." अशी शिकवण आयुष्यभर त्यांनी लोकांना दिली. माणसात देव शोधणारा हा संत लोकांनी दिलेल्या देणग्यांतील पैशांतून रंजल्या-गांजल्या, अनाथ लोकांसाठी महाराष्ट्रात ठिकठिकाणी धर्मशाळा, अनाथालये, आश्रम, व विद्यालये सुरू केली. रंजले-गांजले, दीन-दुबळे, अपंग-अनाथ हेच त्यांचे देव. या देवांतच गाडगेबाबा अधिक रमत असत. डोक्यावर झिंज्या, त्यावर खापराच्या तुकड्याची टोपी, एका कानात कवडी, तर दुसया कानात फुटक्या बांगडीची काच, एका हातात झाडू, दुसया हातात मडके असा त्यांचा वेश असे.

समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, अनिष्ट रूढी-परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले पूर्ण आयुष्य वेचले. यासाठी त्यांनी कीर्तनाच्या मार्गाचा अवलंब केला. आपल्या कीर्तनात ते श्रोत्यांनाच विविध प्रश्न विचारून त्यांना त्यांच्या अज्ञानाची, दुर्गुण व दोषांची जाणीव करून देत असत. त्यांचे उपदेशही साधे, सोपे असत. चोरी करू नका, सावकाराकडून कर्ज काढू नका, व्यसनांच्या आहारी जाऊ नका, देवा-धर्माच्या नावाखाली प्राण्यांची हत्या करू नका, जातिभेद व अस्पृश्यता पाळू नका असे ते आपल्या कीर्तनातून सांगत. देव दगडात नसून तो माणसांत आहे हे त्यांनी सर्वसामान्यांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न केला. गाडगे बाबा हे संत तुकाराम महाराजांना आपले गुरू मानीत. 'मी कोणाचा गुरू नाही, मला कोणी शिष्य नाही' असे ते कायम म्हणत. आपले विचार साध्या भोळ्या लोकांना समजण्यासाठी ते ग्रामीण भाषेचा उपयोग करत असत. गाडगेबाबांनी संत तुकारामांच्या नेमक्या अभंगांचा मुबलक वापरही वेळोवेळी केला. 'देवभोळ्या माणसापासून ते नास्तिकापर्यंत, कोणत्याही वयोगटातील लोकांना गाडगेबाबा आपल्या कीर्तनात सहजपणे गुंतवून ठेवत, आपले तत्त्वज्ञान पटवून देत. त्यांच्या कीर्तनाचे शब्दचित्र उभे करणे माझ्या ताकदीबाहेरचे काम आहे.' असे उद्‌गार बाबांचे चरित्रकार प्रबोधनकार ठाकरे यांनी काढले होते.

**संत गाडगे महाराजविषयी माहिती :** गाडगे महाराज हे ईश्वर कशात आहे ही नेमकी जाणीव असलेले संत आणि गोरगरीब, दीनदलित यांचा ऐहिक व आध्यात्मिक विकास होण्यासाठी अज्ञान, अंधश्रद्धा, अस्वच्छता यांचे उच्चाटन करण्यासाठी तळमळीने कार्य करणारे होते. तीर्थी धोंडापाणी देव



रोकडा सज्जनी |" असे सांगत दीन, दुबळे, अनाथ, अपंगांची सेवा करणारे थोर संत म्हणजे गाडगेबाबा. माणसात देव शोधणाऱ्या या संताने लोकांनी दिलेल्या देणग्यांतील पैशातून रंजल्या-गांजल्या, अनाथ लोकांसाठी महाराष्ट्रात ठिकठिकाणी धर्मशाळा, अनाथालये, आश्रम, व विद्यालये सुरू केली. रंजले-गांजले, दीन-दुबळे, अपंग-अनाथ हेच त्यांचे देव. या देवांतच गाडगेबाबा अधिक रमत असत. डोक्यावर झिंज्या, त्यावर खापराच्या तुकड्याची टोपी, एका कानात कवडी, तर दुसया कानात फुटक्या बांगडीची काच, एका हातात झाडू, दुसया हातात मडके असा त्यांचा वेश असे. .

**संत गाडगेबाबा यांचे बालपण :**

गाडगे महाराजांचा जन्म अमरावती जिल्ह्यातील शेंडगाव येथे झाला. त्यांचे पूर्ण नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर होते. ते त्यांच्या आईच्या माहेरी, मूर्तिजापूर तालुक्यातील दापुरे येथे त्यांच्या मामाकडेच त्यांचे बालपण गेले. त्यांच्या मामाची बरीच मोठी शेतजमीन होती. लहानपणापासूनच त्यांना शेतीत रस होता, विशेषतः गुरांची निगराणी राखायला त्यांना फार आवडे. त्यांचे वडील झिंगराजी हे परीट होते. आई सखूबाईने त्यांचे नाव डेबूजी असे ठेवले होते. डेबूजी लहान असतांनाच त्यांचे वडील दारूच्या व्यसनापायी मृत्युमुखी पडले. त्यामुळे घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची असल्याने लहानपणापासूनच गुरे राखणे, नांगर चालविणे, शेतीवाडी करणे अशी कामे ते करत असत. त्यांना कामाची खूप आवड होती. स्वच्छता हा त्यांचा विशेष गुण होता. डेबूजींचे लग्न लहानपणीच झाले होते. त्यांना चार मुली होत्या. पण ते संसारात फारसे रमले नाहीत. घरदार सोडून अवघ्या समाजाचा संसार सुधारण्यासाठी ते घराबाहेर पडले. .

**सामाजिक सुधारणा :** १८९२ साली त्यांचे लग्न झाले. त्यांच्या मुलीच्या बारश्याच्या दिवशी त्यांनी रूढीप्रमाणे दारु व मटणाच्या जेवणाऐवजी गोडाधोडाचे जेवण दिले होते. हा त्या काळातील परंपरेला दिलेला छेद होता. गावात कोणाचे काही अडले नडले, कोठेही काही काम करावयाचे असले की, गाडगे महाराज स्वतःहून पुढे येत. सार्वजनिक हिताची कामे 'सर्व जनांनी' एकवटून केली पाहिजेत हा धडा त्यांनी मिटल्या तोंडी गावकऱ्यांना शिकविला. दिनांक १ फेब्रुवारी, १९०५ रोजी त्यांनी घरादाराचा त्याग करून संन्यास स्वीकारला. त्यांनी तीर्थाटन केले, अनेक ठिकाणी भ्रमण केले. वनवासातही त्यांनी लोकसेवेचे व्रत सोडले नाही. कोठे कोणी अडचणीत सापडलेला असल्यास त्याला आपण होऊन मदत करायला धावायचे, मदत करून कोणत्याही फळाची अपेक्षा न ठेवता आपल्या वाटेने निघून जायचे हा त्यांचा खाक्या असायचा. ते सतत एक खराटा जवळ बाळगायचे. अंगावर गोधडीवजा फाटके-तुटके कपडे आणि हातात एक फुटके गाडगे असा त्यांचा वेष असे. त्यामुळेच लोक त्यांना 'गाडगेबाबा' म्हणू लागले. ते ज्या गावात जात तो गाव झाडून स्वच्छ करीत. सार्वजनिक स्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन ही तत्त्वे समाजात रुजविण्यासाठी त्यांनी स्वतः सातत्याने सक्रिय राहून जिवापाड प्रयत्न केले. . समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, अनिष्ट रूढी-परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले पूर्ण आयुष्य वेचले. यासाठी त्यांनी कीर्तनाच्या मार्गाचा अवलंब केला. आपल्या कीर्तनात ते श्रोत्यांनाच विविध प्रश्न विचारून त्यांना त्यांच्या अज्ञानाची, दुर्गुण व दोषांची जाणीव करून देत असत. त्यांचे उपदेशही साधे, सोपे असत. चोरी करू नका, सावकाराकडून कर्ज काढू नका, व्यसनांच्या आहारी जाऊ नका, देवा-धर्माच्या नावाखाली प्राण्यांची हत्या करू नका, जातिभेद व अस्पृश्यता पाळू नका असे ते आपल्या कीर्तनातून सांगत. देव दगडात नसून तो माणसांत आहे हे त्यांनी सर्वसामान्यांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न केला. ते संत तुकाराम महाराजांना आपले गुरू मानीत. 'मी कोणाचा गुरू नाही, मला कोणी शिष्य नाही' असे ते कायम म्हणत. आपले विचार साध्या भोळ्या लोकांना समजण्यासाठी ते ग्रामीण भाषेचा उपयोग करत असत. गाडगेबाबांनी संत तुकारामांच्या नेमक्या अभंगांचा मुबलक वापरही वेळोवेळी केला. 'देवभोळ्या माणसापासून ते शहरी नास्तिकापर्यंत,कोणत्याही वयोगटातील लोकांना गाडगेबाबा आपल्या कीर्तनात सहजपणे गुंतवून ठेवत, आपले तत्त्वज्ञान पटवून देत. त्यांच्या कीर्तनाचे शब्दचित्र उभे करणे माझ्या ताकदीबाहेरचे काम आहे .' असे उद्‌गार बाबांचे चरित्रकार प्रबोधनकार ठाकरे यांनी काढले होते. . त्यांनी नाशिक, देहू, आळंदी व पंढरपूर या धार्मिक क्षेत्रांच्या ठिकाणी धर्मशाळा बांधल्या, गोरगरीब जनतेसाठी छोटी-मोठी रुग्णालये बांधली, अनेक नद्यांकाठी घाट बांधले, अतिशय गरीब, अनाथ व अपंग लोकांसाठी अन्नछत्रांची व्यवस्था केली, कुष्ठरोग्यांची सेवा केली. . महाराष्ट्रातील संत परंपरेबाबत 'ज्ञानदेवे रचिला पाया, तुका झालासे कळस' असे म्हटले जाते. संत गाडगेबाबांच्या कार्यामुळे - 'या भागवत धर्माच्या कळसावर गाडगेबाबांनी २० व्या शतकात कर्मयोगाची ध्वजा चढवली' - असे म्हटले जाते. 'महाराष्ट्रातील समाजवादाचे प्रचंड व्यासपीठ', असे यथार्थ उद्‌गार आचार्य अत्रे यांनी संत गाडगेबाबांबद्दल काढले आहेत.लोकसेवेच्या या धकाधकीच्या प्रवासातच त्यांचे अमरावतीजवळ वलगाव येथे पेढी नदीच्या पुलाजवळ २० डिसेंबर १९५६ रोजी देहावसान झाले. 'गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला' या भजनाचा प्रसार करणाऱ्या, कर्मयोगावर दृढ श्रद्धा असणाया या सत्पुरुषाची आणि कर्त्या समाजसुधारकाची समाधी अमरावती येथे आहे. अमरावती विद्यापीठाला 'संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ' असे नाव दिले आहे.

"संत गाडगेबाबांचा दशसूत्री संदेश "

गाडगेबाबा प्रबोधन काव्य

***भुकेलेल्यांना = अन्न***
***तहानलेल्यांना = पाणी***
***उघड्यानागड्यांना = वस्त्र***
***गरीब मुलामुलींना = शिक्षणासाठी मदत***
***बेघरांना = आसरा***
***अंध, पंगू रोगी यांना = औषधोपचार***
***बेकारांना = रोजगार***
***पशु-पक्षी, मुक्या प्राण्यांना = अभय***
***गरीब तरुण-तरुणींचे = लग्न***
***दुःखी व निराशांना = हिंमत***
***गोरगरिबांना = शिक्षण***

हाच आजचा रोकडा धर्म आहे ! हीच खरी भक्ती व देवपूजा आहे !! . **संक्षिप्त चरित्र :** गाडगे महाराजांनी कीर्तनाद्वारे आपले लोकशिक्षणाचे कार्य ऋणमोचन (विदर्भ) या गावापासून सुरू केले. ऋणमोचन येथे त्यांनी 'लक्ष्मीनारायणाचे' मंदिर बांधले.

१९०८ मध्ये पूर्णा नदीवर घाट बांधून घेतला.

१९२५- मूर्तिजापूर येथे गोरक्षणाचे काम केले आणि एक धर्मशाळा व एक विद्यालय बांधले.

१९१७- पंढरपूर येथे चोखामेळा धर्मशाला बांधली.

"मी कुणाचा गुरू नाही व माझा कुणी शिष्य नाही" असे म्हणून त्यांनी कुठल्याही संप्रदायाला समर्थन देण्याचे नाकारले.

फेब्रुवारी ८, इ.स. १९५२ रोजी 'श्री गाडगेबाबा मिशन' स्थापन करून महाराष्ट्रभर शिक्षणसंथा व धर्मशाळा स्थापन केल्या. गाडगे महाराज गोधडे महाराज म्हणूनही ओळखले जात होते. १९३२ - ऋणमोचन येथील सदावर्त संत गाडगेबाबांनी सुरू केले.. . गाडगे महाराजांनी कीर्तनांद्वारे लोकजागृतीचा मार्ग अवलंबला. "गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला" हे गाडगे महाराजांचे आवडते भजन होते.त्यांचे जीवनावर देवकीनंदन गोपाला हा चित्रपटही निघाला आहे. यातील "गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला" हे गीत मन्ना डे यांनी गायले. आचार्य अत्रे गाडगेबाबांबद्दल म्हणतात 'सिंहाला पाहावे वनात, हत्तीला पाहावे रानात, तर गाडगेबाबांना पाहावे कीर्तनात' १९३१ वरवंडे येथे गाडगेबाबांच्या प्रबोधनातून पशुहत्या बंद झाली.

१९५४- गाडगेबाबांनी मुंबईत जे.जे. हॉस्पिटलच्या रोग्यांच्या नातेवाइकांना उतरण्यासाठी हॉस्पिटलजवळ धर्मशाळा बांधली.

गाडगेबाबांनी डॉ. पंजाबराव देशमुख, व कर्मवीर भाऊराव पाटील यांना त्यांच्या कार्यात मदत केली होती. डॉ. आंबेडकर त्यांना गुरुस्थानी मानत असत. २० डिसेंबर १९५६ रोजी पेढी नदीच्या काठावर वलगाव (अमरावती) येथे मृत्यू. गाडगेनगर, अमरावती येथे स्मारक आहे. गाडगेबाबा आणि तुकडोजी महाराज यांचे संबंध अतिशय जिव्हाळ्याचे होते.

**गाडगेबाबा आणि बाबासाहेब आंबेडकर :** १४ जुलै १९४१ ला गाडगेबाबांची प्रकृती ठीक नव्हती. महानंदसामी नावाच्या त्यांच्या चाहत्याने मुंबईत आलेल्या डॉ. आंबेडकरांना गाडगे बाबांची खबर दिली. बाबासाहेब तेव्हा भारताचे कायदेमंत्री होते. आणि त्यांना संध्याकाळच्या ट्रेनने दिल्लीला रवाना व्हायचे होते. बाबांचा निरोप मिळताच त्यांनी सर्व कामे बाजूला ठेवली. २ घोंगड्या विकत घेऊन ते महानंदसामीसह रुग्णालयात गेले. कोणाकडून काही न घेणाया बाबांनी बाबासाहेबांकडून २ घोंगड्या स्वीकारल्या. पण म्हणाले "डॉ. तुम्ही कशाला आले? मी एक फकीर. तुमचे एक-एक मिनिट महत्त्वाचे आहे. तुमचा किती मोठा अधिकार आहे." तेव्हा बाबासाहेब म्हणाले "बाबा माझा अधिकार दोन दिवसाचा. उद्या खुर्ची गेल्यावर मला कोणी विचारणार नाही. तुमचा अधिकार मोठा आहे." या प्रसंगी बाबासाहेबांच्या डोळ्यात अश्रू होते. कारण असा प्रसंग पुन्हा जीवनात येणार नाही हे दोघेही जाणत होते.

**गाडगेबाबांचे विचार :** एकदा गाडगेबाबा रस्त्याने जात असताना...समोर एक व्यक्ती दगडाची पूजा करत असताना त्यांना दिसली. त्याने दगडावर हार चढविला. दुधाने अंघोळ घातली. इतक्यात एक कुत्रा आला आणि मागील पाय वर करून त्या दगडावर मूत्र विसर्जन करू लागला. ती व्यक्ती चिडली. त्याला कुत्र्याचा फार राग आला. तो कुत्र्याला मारण्यासाठी हातात दगड घेऊन धावू लागला. तेव्हा गाडगेबाबा म्हणाले, "बिचाया गरीब मुक्या जनावरांना त्रास का देता ? त्याला हे कुठं माहीत आहे की, माणसांचा देव दगड असतो म्हणून ?"

पंढरपुरात एकदा टिळकाचे भाषण होते. तेवढ्यात बाबा समोरून येत होते. सगळ्यांच्या माना वळल्या. श्रोत्यांच्या मनातले ओळखून टिळकांनी बाबांना स्टेजवर आणले आणि दोन शब्द बोलायला सांगितले. टिळकांचे अथणीला झालेले भाषण बाबांना ठाऊक होते.. स्टेजवर येताच बाबांनी टिळकांच्या ब्राह्मण पंथाला शब्दांनी झाडायला सुरुवात केली. बाबा म्हणाले "टिळक महाराज मी चुकलो. आम्ही हयातभर तुमची कापडं धुतली, इस्त्री केली. तवा आम्ही कसे मार्गदर्शन करू? महाराज काय बी करा पण आम्हालाबी ब्राह्मण करा." संत व सुधारक या दोन्हीही वृत्ती गाडगेमहाराजांत होत्या. तुकारामांप्रमाणे ठणकावून सत्य सांगण्याचे धैर्य बाबांमध्ये होते. जनसंपर्क होता. समाजाचा अर्धा भाग जो स्त्रिया व अतिशूद्र या सर्वांना व सुशिक्षित समाजथरातील जे येतील अशा स्त्रीपुरुषांना एकत्र बसवून, म्हणजे भेदाभेद, स्पृश्यास्पृश्यता संपूर्ण बाजूस घालवून हरिभक्तीचा रस चाखण्यास सर्व वर्गातील, सर्व थरातील बायाबापडी, श्रीमंत व गरीब वगैरे सर्व एकत्र होत. बाबांची कीर्तने ऐकल्यानंतर संत तुकाराम व जोतीबाची शिकवण लोकांप्रत वाहात आहे, असे दिसते. **(संशोधक विद्यार्थी एम. ए. मराठी – पीएच. डी. अपीयर रिसर्च सेंटरः- अंकुशराव टोपे कॉलेज जालना)**

# काँग्रेसची लोकप्रियेता वाढली, 'मूड ऑफ द नेशन' च्या राजकीय सर्वेतून समोर !!

आधुनिक केसरी

लोकसभा 2024 च्या निवडणुकीचं वेध प्रत्येक पक्षाला लागले आहेत. सत्ताधाऱ्यांसह विरोधकांनीही कंबर कसली आहे. निवडणुका जशा जवळ येत आहेत, तशी जनेतच्या मनात राजकीय पक्षाविषयीचं मत बदलत असल्याचं दिसतेय. नुकत्याच झालेल्या एका सर्वेनुसार, भाजपलाला नुकसान होण्याची शक्यता आहे तर काँग्रेसच्या लोकप्रियेत मोठी वाढ होण्याची शक्यता आहे. लोकसभा निवडणुकीला अद्याप एक वर्षाचा काळ आहे, पण यात देशातील राजकारणात मोठा बदल होण्याची शक्यता आहे. सत्ताधारी भाजप आणि काँग्रेससह इतर पक्षांनी 2024 मध्ये होणाऱ्या लोकसभा निवडणुकीची तयारी सुरु केली आहे. लोकसभा निवडणुकीला एक वर्षापेक्षा कमी कालावधी राहिला आहे. त्याआधी मतदारांचा कौल जाणून घेतला आहे. आज तक आणि सी वोटर यांनी जानेवारीमध्ये 'मूड ऑफ द नेशन' अंतर्गत राजकीय सर्वे घेतला होता. सध्याच्या घडीला निवडणूक झाली तर काय निकाल लागू शकतो,



यावर सर्वे घेण्यात आला होता. यात भाजपच्या नेतृत्वातील एनडीएला 298 जागा मिळू शकतात, तर काँग्रेसच्या नेतृत्वातील यूपीएला 153 जागा मिळण्याची शक्यता आहे. तर इतर पक्षांना 92 जागांवर समाधान मानावे लागेल, असं सर्वेतून समोर आलेय. खासदार राहुल गांधी यांची भारत जोडो यात्रा काँग्रेससाठी गेम चेंजर ठरणारं असे दिसून येत आहे 7 सप्टेंबर 2022 रोजी तामिळनाडू मधील कन्याकुमारी येथून यात्रेला प्रारंभ करण्यात आला होता या यात्रेला देशामध्ये भरभरुन प्रतिसाद मिळाला असून सर्वच स्तरातील लोक यामध्ये सहभागी झाले होते भारत जोडो यात्रा पाच महिन्यात सुमारे 3 हजार 570 किमीचे अंतर पार करुन जम्मू - काश्मीरमध्ये यात्रेची सांगता झाली आहे काँग्रेची ही महत्वकांक्षी यात्रा 12 राज्ये व 2 केंद्रशासित प्रदेशामधूनही प्रवास झाला आहे त्यामुळेचं काँग्रेसच्या लोकप्रियतेत वाढ झाल्याचे दिसून येत आहे !!

**राजू जाधव, मांगूर, जि. बेळगांव**

# समर्थ अॅकॅडमीचे कार्य कौतुकास्पद : आ.निलेश लंके !

## विविध गुणदर्शनाच्या माध्यमातून समर्थ अॅकॅडमीचे स्नेहसंमेलन झाले उत्साहात साजरे !

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीकांत चौरे**

**पारनेर :** शैक्षणिक क्षेत्रात सर्व शैक्षणिक उपक्रम राबवत तसेच सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना एक दर्जेदार शिक्षण मिळावे हा अट्टाहास असणारे समर्थ अकॅडमीचे संचालक कैलासजी गाडीलकर सर हे नेहमीच अग्रस्थानी असतात. विद्यार्थ्यांच्या बुद्ध्यांकावरून व त्याच्या अंगी असणाऱ्या विविध कलागुणांची पारख करत त्याला असणाऱ्या आवडीच्या क्षेत्रात नेहमीच व्यासपीठ देत आले आहेत, असे यावेळेस जिल्हा माध्यमिक शिक्षण अधिकारी अशोकराव कडूस यांनी सांगितले .

शुक्रवारी १७ फ्रेब्रुवारी रोजी सायंकाळच्या प्रसन्न वातावरणात श्री.समर्थ अकॅडमीच्या भव्य प्रांगणात पारनेर नगर विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादीचे आमदार निलेश लंके यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच अहमदनगर जिल्हा परिषदेचे माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी अशोकजी कडूस साहेब जिल्हा परिषद सदस्या सौ.राणीताई निलेशजी लंके भारत पेट्रोलियमचे टेरिटोरी कोऑर्डिनेटर कीर्तीकुमार शिंदानी आणि प्राचार्य भाऊसाहेब अनारसे, डॉ. अरुणाताई भांबरे, गणेश देठे सर, भारत पेट्रोलियमचे निरंजन यादव, अमित कुमार राय, प्रमोद पाठक पत्रकार संघाचे मार्तंडराव बुचुडे सर, श्रीकांत चौरे, शिवाजीराव पानमंद सर, सुभाषराव दिवटे, अलिबाग येथील इरिगेशन अभियंता विनायक कुलधर, निता कुलधर, शशिकांत रासकर सर, सोमनाथ खोबरे सर यांच्यासह परिसरातील विविध गावांमधील सरपंच, उपसरपंच पालक व ग्रामस्थ व विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत हा दिमागदार सोहळा पार पडला. श्री समर्थ अकॅडमी संचालित श्री समर्थ इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्सने आयोजित केलेल्या दहाव्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन पारनेर नगर विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादीचे आमदार निलेश लंके यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून संपन्न झाले.

सदर कार्यक्रमासाठी जिल्हा माध्यमिक शिक्षणाधिकारी अशोकराव कडूस साहेब यांच्या हस्ते विविध उपक्रमात नाविन्यपूर्ण योगदान देणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. आमदार निलेश लंके यांच्या प्रमुख उपस्थितीत पारनेरचे नगरसेवक श्रीकांत चौरे यांना नुकताच जाहीर झालेला पत्रकारितेचा राज्यस्तरीय जीवनगौरव पुरस्कार मिळाल्यामुळे या दिमागदार सोहळ्यात त्यांना सन्मानित करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या गुणदर्शन कार्यक्रमासाठी परिश्रम घेणाऱ्या समर्थ अकॅडमीच्या तसेच गतवर्षी एज्युकेशन एक्सलन्स अवार्डने सन्मानित झालेल्या उच्चशिक्षित संचालिका शिल्पा गाडीलकर मॅडम यांचे जिल्हा परिषद सदस्या सौ. राणीताई लंके यांनी कौतुक करत आपल्या शुभेच्छा पर भाषणात सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी गाडीलकर कुटुंबाचे योगदान फार महान आहे, असे सांगत त्यांच्या कार्याचा गौरव केला. प्रास्ताविक प्राचार्य देठे सर, सूत्रसंचालन डॉ.सौ. भामरे मॅडम व ठुबे मॅडम यांनी केले. तर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी योगदान देणारे प्राचार्य देठे सर सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद, बीएड व पॉलिटेक्निक कॉलेजचे सर्व सहकारी विद्यार्थी व पालकांचे आभार समर्थ अकॅडमीचे संचालक कैलासजी गाडीकर सर यांनी मांनले.

> समर्थ अकॅडमीच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळून भविष्यामध्ये त्यांना स्वत :चे अस्तित्व कसे सिद्ध करता येईल . विद्यार्थी मित्रांना प्रेरणादायी शिक्षण व कलागुणांना कसा वाव मिळेल याचा विचार करत नेहमीच वेगवेगळे उपक्रम राबवत आसतात .व त्यातुन सर्वाधिक मुलांना बक्षीस पात्र कसे करता येईल या उद्देशाने उपक्रम राबवले जातात याचे समाधान वाटते . जे विद्यार्थी वर्षभर मेहनत घेत असतात त्याची कौतुकाची थाप मिळाल्यास विद्यार्थी त्या क्षेत्रात नव्या उमेदीने कार्यरत होतो . व तो यशस्वी प्रयत्न गाडीलकर सर या शैक्षणिक संस्थेच्या माध्यमातुन नेहमीच सिद्ध करत आले आहेत . **आ .निलेश लंके**





# छत्रपती शिवरायांचा अपमान हिंदुस्थानमध्ये सहन केला जाणार नाही : अंकिता पवार

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** अखंड हिंदुस्तानाचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती 19 फेब्रुवारी रोजी संपूर्ण देशभरामध्ये मोठ्या उत्साहामध्ये साजरी करण्यात आली. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या कार्यकर्त्यांनी देखील देशभरामध्ये गावागावांमध्ये छत्रपती शिवरायांची जयंती साजरी केली, जवाहरलाल नेहरू विश्वविद्यालय दिल्ली या ठिकाणी देखील विद्यार्थी परिषदेच्या कार्यकर्त्यांनी छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना पुष्पहार अर्पण करून जयंती साजरी केली, परंतु त्या ठिकाणी वामपंथी संघटनांनी छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेचा पुष्पहार काढून फेकून दिला व महाराजांची प्रतिमा एका कोपऱ्यामध्ये फेकून त्याची विटंबना केली या निषेधार्थ अखिल भारतीय विद्यार्थी परिषद संभाजीनगरच्या कार्यकर्त्यांनी क्रांती चौकामध्ये राष्ट्रीय मंत्री अंकिता पवार यांच्या नेतृत्वात वामपंथी संघटनांच्या विरोधात निषेध व्यक्त केला. यावेळी लाल ढेकुण मुर्दाबाद, वामपंथी की कबर खुदेगी छत्रपती के धरतीपर, अशा घोषणा देत, प्रतिकात्मक पुतळा जाळून जाहीर निषेध केला. यावेळी अंकिता पवार म्हणाल्या महापुरुषांचा सातत्याने अवमान करणे या वामपंथीच्या विचारात, रक्तात भिनले असल्यामुळे छत्रपती शिवरायांच्या जयंती दिवशी त्यांच्या प्रतिमेची विटंबना केली या अनपेक्षित कृत्याचा अभाविप जाहीर निषेध करते आणि या देशविरोधी, क्रांतिकारकांच्या विरोधी सतत गरळ ओकनाऱ्या या कम्युनिस्ट संघटनेवर बंदी घालावी अशी केंद्र सरकारकडे मागणी करते. यावेळी प्रदेश सहमंत्री सुरज पावसे, महानगर मंत्री ऋषिकेश केकान, महानगर सहमंत्री अभिषेक गावडे, नगर मंत्री चिन्मय महालेसह आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# शिवजयंतीनिमित्त बाजार सावंगीत शिवगर्जना

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथे अखंड महाराष्ट्राचे आराध्य दैवत ज्यांचे नाव घेताना आपली मान आदराने नतमस्तक होते असे निश्चयाचा महामेरू बहुजनासी आधारू अखंड स्थितीचा निर्धारू असे श्रीमंतयोगी कुळवाडी कुलभूषण श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या 393 व्या जयंती निमित्ताने बाजार सावंगी येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर महाआरती घेण्यात आली तसेच साई इंग्लिश स्कूल व रायझिंग स्टार इंग्लिश स्कूल स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूलच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना लेझीम फेटे बांधून व महाराजांची वेशभूषा केलेल्या विद्यार्थ्यांची घोड्यावर बसून मिरवणूक काढण्यात आली व महाराजांची गीते सादर करण्यात आली मुलांनी विद्यार्थ्यांनी गाण्यावर ठेका धरून आनंद उत्सव शिवजयंती साजरी करण्यात आली यावेळी शिक्षक व गावकरी शिवप्रेमी उपस्थित होते.






# राजूर ग्रामपंचायतच्या वतीने शिवजयंती

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** येथे ग्रामसंसद कार्यालयाच्या वतीने ग्रामस्थांच्या उपस्थितीत विविध सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून मोठ्या उत्साहात शिवजयंती साजरी करण्यात आला.यावेळी संपूर्ण परिसर भगवामय झाला होता. जय जिजाऊ, जय शिवराय, छत्रपती शिवाजी महाराज की जय च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. सर्वप्रथम मंचावर उपस्थित प्रमुख मान्यवर भाजपा नेते शिवाजीराव थोटे,गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर सुधाकरराव दानवे,भगवानराव नागवे, सरपंच प्रतिभाताई भुजंग, योगिताताई दानवे,उपसरपंच जिजाबाई मगरे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी माजी सरपंच भाऊसाहेब भुजंग,गणेश मामा साबळे,गौरखनाथ कुमकर,प्रा.बाळासाहेब बोराडे,ग्रामसेवक प्रमोद पुंगळे,जि.प.माजी सदस्य रामेश्वर सोनुने,बाळूभाऊ मापारी,व्यापारी संघाचे अध्यक्ष राम पारवे,पत्रकार शिवाजी बोर्डे,ग्रामपंचायत सदस्य मुसा सौदागर,श्रीरामपंच पुंगळे,विनोद डवले, आप्पासाहेब पुंगळे, राहुल दरख,संतोष मगरे,निवृत्ती पुंगळे, सुरेश पवार,पंढरीनाथ करपे,परमेश्वर पुंगळे सुनंदा पवार,जिजाबाई करपे,आदी मान्यवर उपस्थित होते.



नवीन वर्षाचा संकल्प करा
आरोग्याची काळजी हा मंत्र खरा

- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि अॅल्युमिनियम

शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट

महावीर
घर संसार



सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, औरंगाबाद

# संत विचार आणि आई-वडिलांची सेवा हाच सुखी जीवनाचा मंत्र

## ह.भ. प. झगरे गुरुजी वाकदकर; पिंपळगाव सुतार येथे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**प्रा. बाळासाहेब बोराडे**

**श्रीक्षेत्र राजूर :** वारकरी संप्रदाय हाच सर्वश्रेष्ठ संप्रदाय असून यात तीर्थ, ग्रंथ, मंत्र ,परंपरा यासह मानवी जातीला जे हवे आहे ते सर्व आहे, असा उपदेश ह. भ. प. झगरे गुरुजी वाकदकर यांनी भोकरदन तालुक्यातील पिंपळगाव सुतार येथे सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहात तिसरे पुष्प गुंफताना केला. प्रत्येकाने संत विचार जोपासून, आई-वडिलांची आणि समाजाची प्रमाणिकपणे सेवा करावी, असे आवाहन ह.भ .प. झगरे गुरुजी यांनी ग्रामस्थांना केले. यावेळी पुढे बोलताना त्यांनी सांगितले की मनुष्याला आजकाल स्वतःकडे पाहण्यास वेळ नसतो. मात्र तो दुसऱ्याचे स्टेटस मोबाईल ठेवतो. त्यामुळे दुसऱ्याकडे लक्ष देण्यापेक्षा स्वतःला वेळ द्या. आपल्याला अनमोल मनुष्य जन्म मिळाला असल्याने त्याचे सोने करा. संतांनी सर्वच क्षेत्रात मानव जातीला मार्गदर्शन करण्यासाठी अमुलाग्र असे वचन त्यांच्या संत साहित्यातून मांडलेले आहेत त्याचा मानव जातीने विचार करावा आणि



त्यासोबतच आपल्याला जन्म देणाऱ्या आई-वडिलांची प्रमाणिकपणे सेवा करा. घराबाहेर पडताना आई-वडिलांना विचारल्याशिवाय घराबाहेर पडू नका. असे सांगून आई-वडिलांची सेवा करा. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य आपल्या अपत्यासाठी काबाडकष्ट करून काळजी घेतलेली असते व व्यसनापासून दूर राहण्याचे संदेश दिला. ज्यांच्या आयुष्यामध्ये सद्यस्थितीत आईबाप नाही आहेत तरी त्यांनी अनाथ न राहता संत विचार जर जीवनात अवतरले तर त्यांना नक्कीच माऊलींचे विचार प्रेमाचा पान्हा पाजणारे आहेत असे गौरवोद्गार त्यांनी काढले. आजचे तरुण हे उद्याची राष्ट्राची संपत्ती असून त्याला व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी आपण सर्वांनी काळजी घेतली पाहिजे, असा मोलाचा सल्ला उदाहरणासह दिला. यावेळी पंचक्रोशीतील महिला,पुरुष, तरुण मंडळींची भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## चैतन्य देवींच्या देखाव्याला सेलूकरांचा मोठा प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**सेलू :** येथील प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय केंद्राच्या वतीने चार दिवस आयोजित महाशिवरात्री उत्सवातील बारा ज्योतिर्लिंग दर्शन व चैतन्य देवींच्या सजीव देखाव्याला भाविकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. सेलू येथील श्री साईबाबा मंदिर सभामंडपात गुरुवारपासून (१६ फेब्रुवारी) माजी नगराध्यक्ष विनोद बोराडे यांच्या उपस्थितीत उत्सवाला सुरुवात झाली. रविवारी (१९ फेब्रुवारी) उत्सवाचा समारोप झाला. सायंकाळी सेलूभूषण उद्योजक जयप्रकाशजी बिहाणी, नंदकिशोरजी बाहेती, नवलकिशोरजी काबरा, श्रीवल्लभजी लोया, जेष्ठ पत्रकार राम सोनवणे, डॉ.विलास मोरे, लक्ष्मण बागल, दिलीप डासाळकर, रेवणअप्पा साळेगावकर, महमंद इलियास, इंजिनिअर बी.एस.कोलते, बाबासाहेब हेलसकर यांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलन झाले.

यावेळी कांचन कोरडे, मोहसीन शेख, निसारखान पठाण, किशोर कटारे, अबरार बेग, बीके शांता बहेनजी, बीके सविता बहेनजी यांची उपस्थिती होती. महोत्सवानिमित्त चार दिवस माता वैष्णोदेवी, लक्ष्मीमाता, गायत्रीमाता, सरस्वतीमाता, महाकाली, दुर्गामाता, भारतमाता, रेणुकामाता आदी चैतन्य देवींच्या रूपांचा सजीव देखावा साकारण्यात आला. सारिका बहेनजी, सान्वी हेलसकर, अहिल्या मोगल, प्रज्ञा तांबे, सारिका पवार, नेहा पद्मावत, श्वेता गबाळे, निकिता पद्मावत, गायत्री आकात, प्रियंका श्रीवास्तव, ममता मिटकरी, मीनाक्षी आकात, वैष्णवी आकात, स्वरा कापसे, गीतांजली मिटकरी आदींनी यामध्ये सहभाग घेतला. तक्षशीला मुळे हीने सादर केलेल्या तांडव नृत्याला, तर अहिल्या मोगल या चिमुकलीने सादर केलेल्या बंब बोले नृत्याला प्रेक्षकांनी उत्स्फूर्त दाद दिली. सूत्रसंचालन सीमा बहेनजी यांनी केले.

## लोजपाच्यावतीने शिवरायांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** अखंड हिंदुस्तानाचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्ताने लोक जनशक्ती पार्टी उत्तर महाराष्ट्र विभाग धुळे जिल्ह्याच्या वतीने धुळे कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये विनम्र अभिवादन करण्यात आले आहे. प्रथमतः आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज, महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा व स्मारकांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले त्यानंतर या महामानवांचा जयजयकार करण्यात आला.
कार्यक्रमाला महापौर प्रतिभाताई चौधरी, शिवाजी चौधरी, लोक जनशक्ती पार्टीचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष दिलीप साळवे, शोभाताई चव्हाण, कुंदन खरात, मधुकर चव्हाण, सर्व पक्षीय नेते हिरामण गवळी, किरण जोंधळे, शंकर खरात, बबन थोरात, सिद्धार्थ साळवे, सूरज साळवे, सम्राट देवरे, सुळके,पत्रकार दिपक वाघ, आकाश सोनवणे, सागर चव्हाण, गौतम वाघ, प्रमोद सोनवणे, बबलू शिंदे, रमेश बागुल, संजय बागुल, सागर परदेशी, तात्या चव्हाण, आधी या कार्यक्रमाला उपस्थित होते.



## बाळापूर येथील अखंड हरिनाम कीर्तन सप्ताहला काका पुतण्याचा सन्मान



आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** बाळापूर येथे महाशिवरात्री निमित्त संगीतमय श्री तुकोबाराय चरित्र कथा व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम कीर्तन सप्ताहाचे दिमाखात आयोजन करण्यात आले होते. ह.भ.प. तुळशीराम शास्त्री यांचे काल्याचे किर्तन शेवटच्या दिवशी पार पडले या काल्याच्या कीर्तनाला दह्याच्या प्रसादाचं मडके फोडण्याचा मान पत्रकार दीपक साहेबराव वाघ, विजय वाघ, या दोघा काका पुतण्यांना देण्यात आला. त्यामुळे सर्वधर्मसमभावाचा संदेश जनमाणसात पोहोचला.

ह. भ. प. श्रीगुरु मोठे बाबा यांच्या प्रेरणेने व ह. भ. प. भुषण महाराज पाटील बाळापूर यांच्या कुशल मार्गदर्शनाने हरिनाम सप्ताह आयोजित करण्यात आला होता. या कीर्तनाच्या प्रारंभास ह.भ. प. तुळशीराम शास्त्री यांचे अमृतवाणी ऐकण्यास ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. किर्तन सप्ताह मध्ये उपदेश श्री तुकोबाराय चरित्र कथा यावर आधारित सांगण्यात आला. अतिशय सुंदर पद्धतीने कीर्तन अखंड हरिनाम कीर्तन सप्ताह पार पडला आहे. कर्तव्यदक्ष व अभ्यासू नगरसेवक संजय रामदास पाटील यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.फकिरा पाटील यांचेकडून पारायण मंडळास ज्ञानेश्वरी ग्रंथ भेट देण्यात आले. या अखंड हरिनाम सप्ताह कार्यक्रमाला भजनी मंडळ तसेच राहुल अशोक पाटील यांच्यासह बाळापुर ग्रामस्थांचे विशेष सहकार्य लाभले. सप्ताहासाठी ज्यांनी ज्यांनी योगदान दिलं अशा मंडळींचे आयोजकांच्या वतीने आभार मानून सप्ताहाची सांगता होते.

# ज्ञानदेव पांडूळे हे समाजभान असणारे कार्यकर्ते : प्रा. सुशीला मोराळे

## ज्ञानदेव पांडूळे यांना कॉ. गोविंद पानसरे स्मृती प्रबोधन पुरस्कार प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** शहीद कॉम्रेड गोविंद पानसरे यांचे शेतकरी, कामगार, कष्टकरी व गोर गरीबांच्या भल्यासाठी अधुरे राहिलेले काम करण्याचा प्रयत्न करणाऱ्या ज्ञानदेव पांडूळे सारख्या समाजभान असणाऱ्या कार्यकर्त्याला कॉम्रेड गोविंद पानसरे स्मृती प्रबोधन पुरस्कार देऊन त्यांचे विचार पुढे नेण्याचे काम शब्दगंधने केले, असे प्रतिपादन प्रा. सुशीला मोराळे यांनी केले. शब्दगंध साहित्यिक परिषद महाराष्ट्र राज्य च्या वतीने कोहिनूर मंगल कार्यालयात आयोजित कॉ. गोविंद भाई पानसरे स्मृती प्रबोधन पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. हमाल पंचायत चे राज्य सल्लागार कॉ. बाबा आरगडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास आ. संग्राम जगताप, प्रा. कॉ. तानाजी ठोंबरे, माजी आ. दादाभाऊ कळमकर, कॉ. स्मिता पानसरे, ज्ञानदेव पांडूळे, शब्दगंध चे अध्यक्ष राजेंद्र उदागे आदी मान्यवर यावेळी विचारपिठावर उपस्थित होते.
यावेळी बोलतांना प्रा. सुशीला मोराळे म्हणाल्या की, डाव्या चळवळीतील कार्यकर्त्यांचा दृष्टीने प्रेरणा, प्रोत्साहन व ऊर्जा देणारी ही कृती आहे. सध्या देशात आणि राज्यात सत्तेवर असलेल्या मनुवादी व फॅसिष्ट प्रवृत्तीवर त्यांनी आपल्या भाषणातून जोरदार हल्ला चढवला. आ. संग्राम जगताप म्हणाले की, ज्ञानदेव पांडूळे यांनी गेल्या ३०-४० वर्षांपासून हमाल पंचायत, शेतकरी, कष्टकरी, कामगार व झोपडपट्टी वासियांसाठी अनेक समाज हिताची कामे केली. नगर पालिका, रयत शिक्षण संस्था, स्काऊट गाईड अशा अनेक पातळीवर शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात काम केले. त्यांच्या या कार्याची शब्दगंध ने या पुरस्काराच्या रूपाने दखल घेतली. व त्यांचा गौरव केला. ही अत्यंत कौतुकास्पद बाब



आहे. कॉ. स्मिता पानसरे म्हणाल्या, कॉ. गोविंद पानसरे यांच्या खुनानंतर देशातील आणि राज्यातील त्यांचा विचार संपला नाही किंवा कॉ. पानसरे ही संपलेले नाहीत. तर महाराष्ट्राच्या काना कोपऱ्यात अनेक पानसरे तयार झाले. आणि त्यांचे विचार सर्वदूर पोहचविण्याचे काम चळवळीतील कार्यकर्ते करीत आहेत. साहित्य हे समाज परिवर्तनासाठी उपयुक्त असणारे हत्यार आहे. सध्याच्या भयावह वातावरणात एक विशिष्ठ भूमिका घेऊन काम करण्याची गरज असते. अशा परिस्थितीत शब्दगंध ने स्वतःची एक ठाम भूमिका घेऊन हे धाडस दाखवलं व बहुजनांना एकत्र करीत रस्त्यावर उतरून लढाई करणाऱ्या ज्ञानदेव पांडूळे सारख्या माणसाचा शोध घेऊन त्यांना कॉ. गोविंद पानसरे यांच्या नावाने दिला जाणारा पुरस्कार दिला. यावेळी आ. दादा भाऊ कळमकर, प्रा. तानाजी ठोंबरे, व कॉ. बाबा आरगडे यांचीही भाषणे झाली. शब्द गंध चे खजिनदार भगवान राऊत यांनी उपस्थितांचे स्वागत केले. सुनिल गोसावी यांनी प्रास्ताविक केले. शर्मिला गोसावी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. अशोक कानडे यांनी आभार मानले. शाहीर भारत गाडेकर यांनी गायिलेल्या वंदन माणसाला या स्वागत गीताने कार्यक्रमास प्रारंभ झाला. मान्यवरांच्या हस्ते ज्ञानदेव पांडूळे यांना कॉ. गोविंद पानसरे स्मृती प्रबोधन पुरस्कार प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमास अॅड. कॉ. बन्सी सातपुते, कॉ. कारभारी उगले आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी राजेंद्र चोभे, राजेंद्र फंड, डॉ. तुकाराम गोंदकर, डॉ. अनिल गर्जे, सुभाष सोनवणे, सुनिल कुमार धस, बबन राव गिरी, स्वाती ठुबे, राजेंद्र पवार आदींनी परिश्रम घेतले.



# शिवाजी महाराजांचा अवमान सहन करणार नाही : अभाविप

आधुनिक केसरी न्यूज

औरंगाबाद : अखंड हिंदुस्तानाचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची सर्व देशभर मोठ्या उत्साहात जयंती साजरी होत असताना JNU दिल्ली विद्यापीठांमध्ये वामपंथी विचारांच्या लोकांकडून छात्रसंघ कार्यालयातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचा हार काढून प्रतिमा खाली टाकण्यात आली. अभाविपचे कार्यकर्ते जाब विचारण्यासाठी गेले असता कार्यकर्त्यांना मारहाण करण्यात आली.

या घटनेच्या निषेधार्थ आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात अभाविपच्या वतीने जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी जिल्हा संयोजक उमाकांत पांचाळ, महानगर सहमंत्री अभिषेक गावडे, विद्यापीठ उपाध्यक्ष माऊली माने, कल्याणी कळकटे यांनी निषेध व्यक्त केला.

यावेळी अजय अटूळे, चिन्मय महाले, दीपाली टिपरसे, प्रतीक्षा भालेराव, डिंपल भोजवानी, अनंत धरपडे सह आदि विद्यार्थी उपस्थित होते.



आधुनिक केसरी न्यूज

छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त शिवाजीनगर ते क्रांतिचौक शिस्तबद्ध वाहन रॅलीचे आयोजन 7व्या वर्षी शुभम काळे पाटील युवा मंच यांच्या तर्फे करण्यात आले होते. यावेळी रॅलीमध्ये महिला, तरुण पारंपरिक वेशभूषा धारण करून सहभागी झाले. रॅलीमध्ये 300 दुचाकींचा सहभाग होता. रॅलीचे उदघाटन राजेंद्र जंजाळ, हर्षदा ताई शिरसाठ, राजेश जंगले, दिग्विजय पाटील, शुभम काळे पाटील यांनी केले.

# सुलतानपूर येथे शिवजयंती उत्सव मोठ्या भक्तीभावाने साजरा

आधुनिक केसरी न्यूज



**सुलतानपूर :** खुलताबाद तालुक्यातील सुलतानपूर येथे आज शिवजयंती मोठ्या उत्साहात व भक्तीभावाने साजरा करण्यात आला. शिवजयंती निमित्त युनिक पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज सुलतानपूर च्या सर्व विद्यार्थ्यांनी पारंपारिक भगवा पोशाखामध्ये शाळेत पदार्पण केले यात काही मुलांना शिवाजी महाराज व मावळे यांचाही पोशाक देण्यात आला होता. त्यानंतर शाळेपासून ते गावातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वरुड पुतळ्यापर्यंत भव्य मिरवणूक काढण्यात आली या मिरवणुकीमध्ये शिवाजी महाराजांच्या पोशाख घातलेल्या विद्यार्थ्याला घोड्यावरती बसून शिवगर्जना करत मिरवणूक राम मंदिरापर्यंत येऊन पुढे गावाकडे गेली. गावामध्ये सुलतानपूरचे भूमिपुत्र असलेले व सध्या नाशिक विभागाचे शिक्षण संचालक बी.बी.चव्हाण यांच्या हस्ते सुलतानपूर येथील भव्य आशा अश्वारूढ शिव पुतळ्याचे दुग्ध अभिषेक करून पूजन करण्यात आले. त्यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या गाण्यांवरती नृत्य सादर केले यामध्ये पाळणा व इतर शिवगीताचा ही समावेश करण्यात आला होता. अफजलखानाच्या वधाचा पोवाडा व देखावा प्रेक्षकांच्या आकर्षन ठरले. बी.बी चव्हाण यांनी मनोगत व्यक्त करताना बालकांना सुसंस्कृत घडवणे व उद्याची सुजाण नागरिक बनवणे हीच खरी शिवजयंती असल्याचे म्हटले आहे.



# वृक्षारोपण अन् वृक्षांचा वाढदिवस करून झाली साजरी शिवजयंती

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** येथील वसुंधरा प्रतिष्ठान ही सामाजिक संस्था गेल्या आठ वर्षांपासून कोणाच्याही आर्थिक मदतीशिवाय वृक्षारोपण अन संवर्धन कार्यात अग्रेसर आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती प्रतिष्ठानने साजरी केली. शिवजयंती निमित्ताने 2021 साली लावण्यात आलेल्या झाडांचा वाढदिवस आणि वृक्षारोपण करून शिवरायांना अभिवादन करण्यात आले. हा अनोखा उपक्रम शहरातील रिंग रोड परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात करण्यात आला. वसुंधरा प्रतिष्ठान ही सामाजिक संस्था कोणाच्याही आर्थिक मदतीशिवाय आपल्या सदस्यांकडून दरमहा पुंजी गोळा करून सामाजिक उपक्रम राबवते. गेल्या आठ वर्षांत नानाविध आणि हटके उपक्रम राबवून वृक्षांची चळवळ घराघरात नेण्यात आली. वसुंधरा प्रतिष्ठानच्या वृक्षरूपी गणेशोत्सवची दखल देशभरात घेण्यात आली. शिवजयंतीचे औचित्य साधून रिंग रोड परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात 2021 साली लावण्यात आलेल्या झाडांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शिवाय, या ठिकाणी नव्याने झाडांची लागवड देखील करण्यात आली. यावेळी 24 तास लगातार लावणी नृत्य सादर करून लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड करणारी सृष्टी जगताप हिच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी झाडे लावा... झाडे जगवा, आम्ही झाडे लावली...आम्ही झाडे जगविली, आम्ही झाडे लावणार... आम्ही झाडे जगविणार... छत्रपती शिवाजी महाराज की जय अशा घोषणा देण्यात आल्या. या उपक्रमात सृष्टीचे वडील सुधीर जगताप, प्रा.योगेश शर्मा, कार्याध्यक्ष अमोलआप्पा स्वामी, कोअर कमिटी सदस्य शिवाजी निरमनाळे, सदस्य संजय माकुडे आदींनी सहभाग नोंदवला.

शिवरायांची शिकवण, चला करू निसर्ग संवर्धन : प्रा .योगेश शर्मा
छत्रपती शिवाजी महाराज यांनी नेहमीच निसर्ग संरक्षण करिता पुढाकार घेतला . त्या काळात त्यांनी मावळ्यांना वृक्ष तोडण्यापासून मज्जाव केला होता . शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी शिवाजी महाराज शेतातून घोडे स्वार करू नयेत अशा सूचनाही करायचे . छत्रपती शिवाजी महाराज यांनी नेहमीच निसर्ग संवर्धनासाठी पावले उचलली . त्यांनी दिलेली निसर्ग संवर्धनाची शिकवण सर्वांनी आत्मसात करावी, असे आवाहन वसुंधरा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा .योगेश शर्मा यांनी केले .

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका

(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# ग्राम रोजगार सेवक उपाशी... गुत्तेदार खातोय तुपाशी

## प्रत्यक्ष मजूर नसल्याने प्रशासनाची दमछाक; गुत्तेदार यांना फोटोवर फोटो मारा म्हणणारा ऐपीओ कोण ?

आधुनिक केसरी न्यूज

**महेश कोळी**

**औसा (जि.लातूर) :** महाराष्ट्र मध्ये ग्रामरोजगार सेवकांचा संप एकोप्याने सुरू असतानाच औशाच्या गटविकास अधिकाऱ्यांनी ग्रामरोजगार सेवकावर दबाव तंत्र वापर होईल या पद्धतीने पत्र काढले असून या पत्रामध्ये संदर्भात दिनांक 25 जानेवारी 2023 पासून संप सुरु आहे.

आपल्या संपामुळे मनरेगा विभागातील भरपुर प्रमाणात सुरु असलेले कामाची मागणी येत नसल्यामुळे अनेक कामे केवळ आपल्या मजूर मागणी अभावी प्रलंबीत राहत आहेत. बिहार पॅटर्न औसा तालुक्यात भरपुर प्रमाणात कामे चालु आहेत. केवळ आपल्या संपामुळे व मजूर मागणी न केल्यामुळे मजूर झाडास पाणी देत नसल्यामुळे झाडे वाळत आहेत. मोठया प्रमाणात झालेला खर्च भरुन निघणे कठीन होत आहे तरी आपणास या पत्राव्दारे सुचीत करण्यात येते की, आपला संप मागे घेऊन कामे पुर्ववत सुरु करावे. असे पत्र युवराज म्हेत्रे गटविकास अधिकारी, औसा यांनी काढले आहे.

यामुळे ग्राम रोजगार सेवकांमध्ये गट विकास अधिकारी यांच्या त्या पत्रामुळे संभ्रम निर्माण झाल्याचे चित्र तालुक्यांमध्ये दिसून येत आहे. कारण या पत्रामध्येच जितकी झाडे जिवंत आहेत आणि ज्या ठिकाणी मजूर कामावर आहेत ते खात्री करून मस्टर काढण्यात यावे याची तपासणी ही पंचायत समिती स्तरावरून अचानकपणे करण्यात येईल अशी सूचनाही त्यांनी या पत्रामध्येच करायला हवी होती अशी सध्या चर्चा ग्रामरोजगार सेवकांमध्ये सुरू आहे. त्यामुळे सदरील पत्र हे गुत्तेदार धार्जिणे असल्याचे बोलले जात असून त्यामुळे रोजगार सेवक उपाशी गुत्तेदार तुपाशी अशी अवस्था तालुक्यात सुरु झाली आहे. काही गुत्तेदार यांनी गटविकास अधिकारी यांना भेटून मस्टर चालू करा असे सांगितल्याची व आम्ही भेटल्यामुळेच मस्टर निघत असल्याचा गाजावाजा पंचायत समितीच्या आवारात दबक्या आवाजात सुरु आहे. यावरून शिस्तप्रिय असणारे गटविकास अधिकारी कसे निर्णय घेतील हे पहाणे गरजेचे आहे. ग्रामरोजगार सेवक हे अर्धवेळ असल्याने ते वेळोवेळी पूर्णवेळ ही मागणी शासनाकडे पाठपुरावा करीत आहेत पण शासन दरबारी दखल घेतली जात नसून जो काम करतो तोच उपाशी ठेवण्याचे शासनाचे धोरण असून आता संपुर्ण महाराष्ट्रात ग्राम रोजगार सेवकाच्या मागण्या मान्य होत नाहीत तोपर्यंत हजेरी पत्रकारांवर एक वेळची हजेरी घेणार असल्याचे संघटनेच्या वतीने कळवण्यात आले आहे.



शासनाने सार्वजनिक कामांवर ऑनलाईन मजुरी घेणे बंधनकारक केले असून, प्रत्यक्ष मजूरांचे फोटो घेणे व कामातील पारदर्शकता यावी यासाठी ही पध्दत सुरु केली आहे . परंतु, औशातील एक ऐपीओने यामध्ये पळवाट काढत चक्क फोटोंवर फोटो मारा कोणी पाहत नाही, असे गुत्तेदार यांना सांगितले असल्याने काही ठिकाणी रोजगार सेवक यांना दमदाटी करून फोटो काढल्याची प्रकार घडले असून संदरील ऑनलाईन फोटो संदर्भात सामाजिक संघटनांनी आवाज उठवला . परंतु, ते प्रकरण जसे थै ठेवल्याचे बोलले जात असून संबंधित ऐपीओ वर काय कारवाई होईल की नाही ? हे पाहणे गरजेचे आहे .

# सांगोला नगरपरिषद मार्फत शिवजयंती पर्यावरणपूरक पद्धतीने साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**रवींद्र कांबळे**

**सांगोला :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या 393 व्या जयंतीचे औचित्य साधून शहरात विविध ठिकाणी 393 देशी वृक्षांची लागवड करून सांगोला नगरपरिषद मार्फत पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

पर्यावरण संवर्धनासाठी राज्यभर सुरू असलेल्या माझी वसुंधरा अभियानाची सांगोला नगरपरिषद मार्फत प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. याचाच एक भाग म्हणून सांगोला शहरास पर्यावरण पूरक हरित शहर बनवण्याच्या दृष्टीने नगरपरिषद मार्फत शहरात मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड केली जात असून त्याची जोपासना ही केली जात आहे. संपूर्ण महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांची 393 वी जयंती 19 फेब्रुवारी 2023 रोजी संपूर्ण महाराष्ट्रभर मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येत आहे. महाराजांची ही 393 वी जयंती असल्याने यानिमित्ताने 393 वेगवेगळी देशी प्रजातीची झाडे लावण्यात येऊन ही जयंती पर्यावरण पूरक पद्धतीने साजरी केली गेली. यावेळी वृक्ष लागवड मा.तहसीलदार तथा प्रशासक श्री.अभिजीत पाटील व मुख्याधिकारी श्री.सुधीर गवळी यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. सदर वृक्षारोपण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली पाणीपुरवठा अभियांता श्री तुकाराम माने व नगरपरिषद पाणीपुरवठा विभागाची टीम यांनी विशेष मेहनत घेतली. ही वृक्ष लागवड मोहीम तहसीलदार तथा प्रशासक श्री.अभिजीत पाटील मुख्याधिकारी सुधीर गवळी, पाणीपुरवठा अभियंता तुकाराम माने, कार्यालय अधीक्षक विजयकुमार कन्हेरे, सहायक मालमत्ता पर्यवेक्षक स्वप्निल हाके, सीएलटीसी स्थापत्य अभियंता अमित कोरे, स्वच्छता निरीक्षक विनोद सर्वगोड, सहाय्यक प्रकल्प अधिकारी योगेश गंगाधरे तसेच कार्यालयीन कर्मचारी व पाणीपुरवठा विभागातील कर्मचारी यांच्या उपस्थितीत पार पडली.





# महावितरणच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत औरंगाबाद परिमंडलाच्या खेळाडूंचे यश

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** येथे नुकत्याच झालेल्या महावितरणच्या राज्यस्तरीय आंतरपरिमंडलीय क्रीडा स्पर्धेत औरंगाबाद - नांदेड-लातूर परिमंडलाच्या संघाने विविध क्रीडा प्रकारांत पदके पटकावली आहेत. औरंगाबाद परिमंडलात कार्यरत पदकविजेत्या सर्व कर्मचारी खेळाडूंचा प्रभारी सहव्यवस्थापकीय संचालक सचिन तालेवार यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक देऊन गौरव करण्यात आला.

राज्यस्तरीय स्पर्धेत उपकार्यकारी अभियंता तेजस शहा, अनुदेशक दिलीप पवार, उपव्यवस्थापक प्रकाश जगताप, अतिरिक्त कार्यकारी अभियंता दीपक माने यांच्या चमूने ब्रीजमध्ये सांघिक सुवर्णपदक पटकावले. मुख्य तंत्रज्ञ सय्यद अकबर यांना बॅडमिंटन व निम्नस्तर लिपिक परमेश्वर जाधव यांना व्हॉलीबॉलमध्ये सांघिक रजतपदक मिळाले. उच्चस्तर लिपिक संगीता यादव यांना थाळीफेक या क्रीडाप्रकारात वैयक्तिक रजतपदक मिळाले. निम्नस्तर लिपिक पल्लवी गायकवाड यांना टेनिक्वाईटमध्ये सांघिक तसेच दुहेरीत रजतपदक मिळाले.

सर्व यशस्वी खेळाडूंचा औरंगाबाद प्रादेशिक कार्यालयाचे प्रभारी सहव्यवस्थापकीय संचालक सचिन तालेवार यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक देऊन गौरव करण्यात आला. यावेळी खेळाडूंचे अभिनंदन करताना तालेवार म्हणाले की, महावितरणच्या कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड गुणवत्ता आहे. विविध कला व क्रीडा स्पर्धांमध्ये ते चांगली कामगिरी करून कंपनीचा नावलौकिक वाढवतात. यापुढेही ते राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर महावितरणचे नाव उंचावतील, अशी अपेक्षा व्यक्त करून खेळाडूंना त्यासाठी सर्वतोपरी साह्य करण्याची ग्वाही त्यांनी दिली.

खेळाडूंच्या गुणगौरव समारंभास औरंगाबाद परिमंडलाच्या पायाभूत आराखडा विभागाचे अधीक्षक अभियंता संजय सरग, शहर मंडलाचे अधीक्षक अभियंता प्रकाश जमधडे, प्रादेशिक कार्यालयाचे अधीक्षक अभियंता उत्क्रांत धायगुडे, सहायक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) शिल्पा काबरा, प्रभारी सहमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी विश्वास पाटील, सहायक अभियंता विपुल पिंगळे उपस्थित होते.

# कळंब तालुका पत्रकार मंडळ अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल घोगरे यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज



**उस्मानाबाद :** जिल्ह्यातील कळंब तालुका पत्रकार मंडळाच्या अध्यक्षपदी रोखठोक लिहिणारे पत्रकार धनंजय घोगरे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा विविध ठिकाणी सत्कार करण्यात येत आहे कळंब तालुका पत्रकार मंडळाची बैठक दोन दिवसांपूर्वी पार पडली.

त्या बैठकीत रोखठोक लिहिणारे निर्भीड पत्रकार म्हणून परिचित असणारे धनंजय घोगरे यांची कळंब तालुका पत्रकार मंडळाचे नवे अध्यक्ष म्हणून सर्वानुमते निवड झाली या निवडीबद्दल घोगरे यांचा सत्कार भारतीय जनता पार्टीचे युवा मोर्चा प्रदेश कार्यकारणी सदस्य मकरंद पाटील, अनुसूचित जाती मोर्चा प्रदेश कार्यकारणी सदस्य सतपाल बनसोडे, कळंब तालुका सरचिटणीस संजय जाधवर प्रदेश कार्यकारिणी सदस्य शिवाजी गिड्डे, मतीन पटेल यांनी घोगरे यांचा सत्कार केला तर दुसऱ्या कार्यक्रमात भाजपाचे धाराशिव उपजिल्हाप्रमुख संजय घोगरे, काँग्रेसचे उद्धवराव धस्स, बाळासाहेब शेळके मोहिते तात्या, सेनेचे संजय गरड त्याचबरोबर व्यापारी तात्यासाहेब शिंदे, किशोर घोगरे, सुनील शितोळे यांच्यासह अनेकांनी घोगरे यांचा निवडीबद्दल सत्कार केला यावेळी अनेक जण उपस्थित होते.

# बारावी परीक्षा केंद्रावर विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन पोलीस अधीक्षकांनी केले स्वागत

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे बारावी परीक्षा २१ फेब्रुवारीपासून सुरू झाली आहे. त्या अनुषंगाने धुळे तालुक्यातील फागणे येथील सी एस बाफना हायस्कूल या परीक्षा केंद्रावर पोलीस अधीक्षक संजय बारकुंड, तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय शिंदे यांनी अधिकाऱ्यांसमवेत पाहणी करून परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प देऊन स्वागत केले व परिक्षेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. 12 वीच्या परिक्षा केंद्रावर होणारे गैरप्रकार रोखण्यासाठी पूर्ण राज्यात "कॉपीमुक्त अभियान" राबविण्यात येणार आहे. अभियान"राबविण्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, जिल्हा पोलिस अधीक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी व सर्व जिल्हा प्रशासनाने एकत्रित काम करावे अशा सूचना आल्या आहेत. त्या अनुषंगाने धुळे जिल्ह्यातही शासनाच्या आदेशान्वये कॉपीमुक्त अभियान राबविण्यात येत आहे. तर आज धुळे तालुक्यातील फागणे गावातील सी एस बाफना हायस्कूल या संवेदनशील केंद्राची पोलीस अधीक्षक संजय बारकुंड , तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय शिंदे, यांनी पाहणी करून विद्यार्थ्यांना कॉफी मुक्त तणामुक्त वातावरणात परीक्षा संदर्भात मार्गदर्शन करून गुलाब पुष्प देऊन त्यांचे स्वागत केलं आहे. तसेच परीक्षा केंद्रावर कॉफी संदर्भात गैरप्रकार आढळल्यास कारवाई करण्याचा इशारा देखील पोलीस अधीक्षक संजय बारकुंड यांनी दिला आहे. तरी जिल्ह्यात बारावी साठी 45 परीक्षा केंद्र असून त्यात 34 संवेदनशील व 11 असंवेदनशील केंद्र आहेत तर दहावी साठी 66 परीक्षा केंद्र असून त्यापैकी 44 संवेदनशील, व 10 असंवेदनशील केंद्र असल्याची माहिती ही पोलीस अधीक्षक संजय बारकुंड यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना दिली आहे. परीक्षा केंद्रावर बंदोबस्त तैनात करण्यात आला यावेळी बंदोबस्तला पीएसआय अनिल महाजन, पोलीस हेड कॉन्स्टेबल प्रवीण पाटील, योगेश पाटील, पो.हवालदार कांबळे, तसेच फागणे बीटचे पोलीस हेड कॉन्स्टेबल दिनेश देवरे, पोलीस कर्मचारी ज्ञानेश्वर शिंदे, सुमित ठाकूर, व होमगार्ड कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

# ७ लाख रुपयांची लाच घेताना टोल अधिकारी जाळ्यात

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** तब्बल ७ लाख रुपयाची लाच स्वीकारताना इरकॉन सोमा टोल कंपनीच्या फायनान्स अधिकाऱ्याला रंगेहात पकडले आहे. इरकॉन सोमा टोलवे प्रा.लि. कंपनी दिल्ली यांच्या अथोरिटीतील महामार्ग क्रमांक 3 मुंबई आग्रा महामार्गावरील चांदवड टोल नाका याच्या देखभाल दुरुस्तीचा करार केला आहे. या टोलनाक्याची जानेवारी 2023 पर्यंतची थकीत रक्कम व धुळे जिल्ह्यातील लळिंग टोलनाका व्यवस्थापनाचा ठेका मिळवून देण्यासाठी तक्रारदाराकडे स्वतासाठी 2 लाख आणि इरकॉन सोमा टोलवे कंपनीच्या संचालकासाठी 5 लाख असे तब्बल 7 लाख रुपये लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम स्विकारतांना टोलवे कंपनीच्या अकाऊंटन्टींग व फायन्नस अधिकारीला धुळे लाचलुचपत विभागाच्या पथकाने रंगेहाथ अटक केल्याची घटना घडली आहे. तक्रारदार यांनी कोअर असोसिएटस कंपनीचे चांदवड टोल प्लाझाच्या व्यवस्थापना बद्दलचे डिसेंबर 2022 ते जानेवारी 2023 चे रिअँम्बर्समेंन्ट रक्कम अदा करण्यासाठी व कोरल असोसिएटसने धुळे लळींग टोल प्लाझा व्यवस्थापनाचा ठेका मिळण्यासाठी भरलेली निवीदा मंजूर करण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे दि 19 फेब्रुवारी रोजी धुळे लळींग इरकॉन सोमा टोलवे चे फायन्नन्स अधिकारी हरिष सत्यवली यांनी स्वतासाठी दोन लाख व इरकॉन सोमा टोल व प्रा.ली. नवी दिल्लीचे संचालक प्रदीप कटियार यांच्यासाठी 5 लाख अशी एकूण 7 लाखांची मागणी केली होती. इरकॉन सोमा टोलवे प्रा.लि. कंपनी अधिकाऱ्यांनी केलेल्या या मागणी नुसार तक्रारदाराने 21 फेब्रुवारी रोजी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केल्यानंतर आज लाचेची रक्कम घेऊन लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्याच्या सक्षम ती लाच देत असताना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्याला रंगेहात ताब्यात घेतले आहे.

# बहुजन समाजाने खरा इतिहास वाचला पाहिजे : दुशांत निमकर

आधुनिक केसरी न्यूज

**पोंभुरणा :** छत्रपती शिवाजी महाराज मराठा साम्राज्याचे संस्थापक, रयतेचे राजे, लोककल्याणकारी, राजाधिराज यांच्या जयंतनिमित्य पोंभूर्णा तालुक्यातील चेकखापरी या गावातील युवा शिवप्रतिष्ठान मंडळातर्फे व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून बोलताना दुशांत निमकर यांनी बहुजन समाजाने खरा इतिहास वाचला पाहिजे असे प्रतिपादन केले. दिवसभर शिवजयंती अत्यंत जल्लोषात साजरी करण्यात आली आणि सायंकाळी व्याख्यानाचा कार्यक्रम घेण्यात आला होता. याप्रसंगी बोलताना दुशांत निमकर म्हणाले की, शेतकरी जगला तर देश टिकेल. आजही खऱ्या अर्थाने शिवबाच्या विचारांची गरज अधोरेखित केली.
याप्रसंगी देवानंद रामगिकर यांनी शिवरायांच्या विचारांची गरज याविषयी मार्गदर्शन केले तर सचिन दळवी यांनी शालेय विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी शिवविचारपिठावर गावातील प्रथम नागरिक सरपंच दर्शनाताई जुमनाके, पोलिस पाटील श्री यशवंत थेरे, हेमेंद्र देवाळकर, शंकर उरकुडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन देवा पिंपळशेंडे यांनी केले तर उपस्थितांचे आभार यशवंत झाडे यांनी मानले.






# शिव व्याख्यानकर्त्यांचा अपमानः अनिल बोंडे यांना जोडे मारो

## बीजेपी प्रसिद्धीसाठी महापुरुषांचा अपमान करतात युवा सेनेचा आरोप

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** भारतात बीजेपी ची सत्ता आल्यापासून वारंवार महापुरुष व इतर व्यक्तीन संदर्भात काहीही बोलून विटंबना केली जात आहे अशाच प्रकारे शिव व्याख्यानात भाजप खासदार अनिल बोंडे शिवप्रचारक यांना शिवीगाळ करून त्यांचा अपमान करण्यात आला त्यामुळे धुळे जिल्हा युवासेनेकडून स्वस्तिक चौक येथे त्यांच्या फोटोला जोडे मारून निषेध व्यक्त करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त अमरावतीत सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीतर्फे आयोजित केलेल्या शिवव्याख्यानात व्याख्याते तुषार उमाळे व्याख्यान देत असतांना व्यासपीठावर उपस्थित असलेले भारतीय जनता पक्षाचे मजोर खासदार अनिल बोंडे यांना शिवरायांबद्दल भाषण सहन न झाल्याने त्यांच्याकडून व्याख्यात्याना अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करण्यात आली असा आरोप युवा सेना तर्फे करण्यात आला छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान व्हावा हीच भारतीय जनता पक्षाचे संस्कृती आहे . महाराजांचे महत्व महाराष्ट्रातून संपुष्टात यावे असा दुष्ट हेतू भाजपच्या नेत्यांचा आहे असे आरोप ही करण्यात आले माजी राज्यपाल कोशारी यांनी शिवरायांचा अपमान केला होता , तरी भाजपच्या वतीने साधी विरोधाची भूमिका देखील घेण्यात आली नव्हती . त्याच पद्धतीने आता शिवव्याख्याते यांचे भाषण रोखून एक प्रकारे पदाचा , सत्तेचा गैरवापर करून अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर घाला घालण्याचे काम भाजपचे लोकप्रतिनिधी वेळोवेळी करतांना दिसत आहेत . धुळे जिल्हा युवासेनेच्या वतीने शिवव्याख्याते मा तुषार उमाळे यांचा भर व्यासपीठावर अपमान करणाऱ्या भाजप खासदार अनिल बोंडे याच्या प्रतिमेला जोडे मारत जाहीर निषेध करण्यात आला , तसेच खासदार अनिल बोंडे यांनी शिवव्याख्यात्यांची जाहीर माफी मागावी , अन्यथा महाराष्ट्रातील तमाम शिवभक्त व शिवप्रेमी आक्रमक होतील असा इशारा युवासेना धुळे जिल्हा पदाधिकारी यांनी दिला आहे. यावेळी युवासेना जिल्हाप्रमुख हरीष माळी, उपजिल्हाप्रमुख कुणाल कानकाटे, महानगरप्रमुख सिद्धार्थ करनकाळ, अमित खंडेलवाल, योगेश मराठे, जीत पाटील, स्वप्निल सोनवणे, सिद्धेश नाशिककर, वैभव चव्हाण, निलेश चौधरी, भूषण चौधरी, जयेश फुलपगारे, अमिन शेख, मनिष माळी, शुभम कुलपगारे, हर्षल साळुंखे, बाबा नाईक, निखिल खैरनर, विवेक तावडे, हुर्बल कलंद,हरीष गंगाधर माळी उपस्थित होते.

# खुनातील आरोपीला धुळे पोलिसांनी केले जेरबंद

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** मयत आदर्श दत्तात्रय पिसाळ व रोहीदास दादासाहेब जाधव रा. निबळक ता. फलटन, जि. सातारा (आरोपी) हे दोघे सोबत ट्रॅक्टरव्दारे शेतीची माती लेव्हलींगचे काम करत होते. यातील आरोपी याने मजुरीच्या पैशासाठी दारु पिऊन वाद घालुन ट्रॅक्टरचे स्टॅपलींग रॉडने मयताचे डोक्यावर वार करुन त्याचा खुन केला आहे. दिलेल्या तक्रारीवरुन धुळे तालुका पोलीस ठाणे येथे 302 गुन्हा दाखल आहे.सदर गुन्हयातील आरोपी रोहीदास दादासाहेब जाधव रा. निबळक ता. फलटन जि. सातारा हा निबळक ता. फलटन, जि.सातारा येथे पळुन गेलेला आहे अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने पोलीस निरीक्षक श्री. हेमंत पाटील यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पथक फलटन जि. सातारा येथे रवाना झाले होते. सदर पथकाने फलटन ग्रामिण पोलीस स्टेशन यांच्या मदतीने आरोपी रोहीदास दादासाहेब जाधव यास दिनांक २१/०२/२०२३ रोजी निबळक गावातून ताब्यात घेवुन त्यास गुन्हयासंदर्भात विचारपुस करता त्याने सांगितले की, मयत आदर्श दत्तात्रय पिसाळ व आरोपी रोहीदास दादासाहेब जाधव हे सोबत ट्रॅक्टरव्दारे शेतीची माती लेव्हलींगचे काम करीत होते त्यांचेत मजुरीच्या पैश्यावरुन वाद झाल्याने आरोपी रोहीदास जाधव याने मयत आदर्श पिसाळ यास ट्रॅक्टरचे स्टॅपलींग रॉडने डोक्यावर वार करुन त्यास जिवे ठार मारुन पळुन गेल्याचे कबुल केले आहे. आरोपी रोहीदास दादासाहेब जाधव, रा. निबळक ता. फलटन जि. सातारा याने गुन्हयाची कबुली दिल्याने त्यास गुन्हयाचे पुढील तपासकामी धुळे तालुका पोलीस ठाणे येथे हजर करण्यात आले आहे .सदरची कारवाई संजय बारकुंड, पोलीस अधीक्षक, धुळे किशोर काळे, अपर पोलीस अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, योगेश राऊत, संजय पाटील, श्रीकांत पाटील, प्रभाकर बैसाणे, संदीप सरग, योगेश चव्हाण, कमलेश सुर्यवंशी, राहुल गिरी यांनी केली आहे.



# भूमाफिया मुलगा दोन साथीदारांसह अटकेत; बाप फरार

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** बोगस दस्तऐवज तयार करून अर्धा भूखंड बळकावणाऱ्या रेकॉर्डवरच्या गुन्हेगाराला जिन्सी पोलिसांनी अटक केली. तीन महिन्यांपूर्वीच तो शिक्षा भोगून आला होता. तसेच त्याच्या आणखी दोन साथीदारांनाही बेड्या ठोकल्या मुलगा अटक झाल्याचे पाहताच आरोपी बाप फरार झाला. आरोपीना न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. अलिमोददीन जलल्लोददीन खान,रा. कट्कटगेत, फारूक खान इकबालखान रा. बाबर कॉलनी, शेख मुकीम शेख अहमद रा चिश्तीया कॉलनी अशी अटक आरोपीची नावे आहेत तर जललोद्दीन जमालोद्दीन हा चौथा आरोपी फरार आहे. वरील चारही आरोपी हे भूमाफिया असून यापूर्वीत्यानी अनेक गुन्हे केल्याचे जीनसी पोलिसांना प्राथमिक तपासात आढळले. हत्तेससिंग पुऱ्यातील व्यापारी अब्दुल रहीम अब्दुल करीम (७०) यांनी १९९० साली हत्तेसिंग पुऱ्यातील ३३ गुंठे भूखंड खरेदी केला आहे त्यापैकी २७ गुंठे उरला आहे. वरील आरोपीनी त्यापैकी १९ हजार चौरस मी. एवढा तुकडा बोगस दस्तऐवज तयार करून बळकावला तो भूखंड खरेदी करण्यासाठी आलेल्या ग्राहकाने ही जमीन अलिमोद्दीन यांची असल्याचे सांगताच अब्दुल रहीम यांनी जिन्सी पोलिसांकडे धाव घेतली. पोलिसांनी खातरजमा करून चौघांपैकी तिघांना बेड्या ठोकल्या या प्रकरणातील प्रमुख आरोपी अलिमोद्दीन याच्यावर खुनाचा प्रयत्न करणे, दरोडा असे गुन्हेही दाखल आहेत. वरील कारवाई पोलीस निरीक्षक अशोक भांडारे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय अनंता तांगडे यांनी पार पाडली.

# कन्नड शहरात शिवजयंती जल्लोषात साजरी

आधुनिक केसरी न्यूज



**कन्नड :** शिवजयंती उत्सव समिती जल्लोषत साजरा करण्यात आला. छ.शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास समितीचे आध्यक्ष संदीप खरे यांच्या हस्ते दुग्ध अभिषेक करण्यात आला. या प्रसंगी ताहसिलदार संजय वारकड मुख्याधिकारी नंदकिशोर भोम्बे, संस्थापक अध्यक्ष सुनील पवार, पोलिस निरीक्षक राजीव तळेकर, मनोज देशमुख, शेखर शिंदे, सुरेश चव्हाण, साईनाथ करवंदे विजय भोसले, सिद्धार्थ निकाळजे, अमोल मैराळ ,संदेश पवार,प्रकाश सिरसे, प्रदीप बोडखे, अविनाश काळे, श्रीराम घुगे यांची उपस्थिति होती. दिवसभरातिल कार्यक्रमात आ. उदयसिंग राजपूत, युवा ऊद्योजक मनोज पवार, नगराध्यक्ष संतोष कोल्हे, संजना ताई जाधव, संजय खंबायते, केतन काजे, संजय मोटे,सहाय्यक निबंधक सागर पवार, ई. प्रमुख उपस्थिती होती. दिवसभरात विविध स्पर्धा घेण्यात आल्या. विविध कला गुणदर्शन, वेशभूषा, रांगोळी, चित्रकला ई. स्पर्धा सर्वांसाठी घेण्यात आल्या. संध्याकाळी मिरवणूक ऊद्योजक मनोज पवार यांच्या हस्ते नारळ फोडून करण्यात आले. यावेळी मिरवणूक शांततेत होण्यासाठी कार्यकारिणी सदस्य गोरख पाटिल,उपाध्यक्ष पवन ठाकूर, योगेश जाधव, सचिव सोपान शिरसाठ, कार्याध्यक्ष यश गायकवाड, कोषाध्यक्ष संदीप नरवडे, सहसचिव राकेश शर्मा, गणेश साळुंके, सहकोषाध्यक्ष गोविंद वर्मा, किशोर पवार, प्रवीण जमदाले, प्रवीण वेताळ, निलेश काथार, विजय बोरसे, राहुल सिरसे,बाळू आल्हाड, शिवराज पाटील, अमोल जाधव, प्रवीण दाभाडे, नितीन घाडगे, दीपक डोळस, साईनाथ करवंदे, विष्णू मनगटे ईत्यादीनी विशेष परिश्रम घेतले. सांगता जिजाऊ वंदना व राष्ट्र.गिताने झाली.

# शिवजयंतीनिमित्त म. चिंचोली येथे जन्मसोहळा साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त तालुक्यातील मच्छिंद्रनाथ चिंचोली येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीचा अभूतपूर्व असा सोहळा पार पडला.सायंकाळी 6 ला गावातुन भव्य दिव्य टाळ मुर्दुंग व घोषणेस दिलेल्या प्रतीसादाने वातावरणात एक नवीन स्फूर्ती निर्माण झाली गलीतील महिलांनी रांगोळी सह अरतीच्या ताट सजले होते फटाक्याच्या अतिश बाजिच्या गजरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पालखी सह भव्य शोभायात्रा काढण्यात आली.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नामाचा गजर करत टाळ मृदंगाच्या ठेका धरत भजन, फुगडीमध्ये उत्स्फूर्तपणे हजारोंनी सहभाग घेतला तरूणांनी शिवरायांचा जयजयकार केला 9 च्या सुमारास शिवजन्मोत्सवाचा नेत्रदीपक सोहळा पार पडला हा सोहळा याची देही याची डोळा पाहण्यासाठी हजारो शिवभक्तांनी गर्दी केली होती मच्छिंद्रनाथ मंदिर परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात हा पाळणा सोहळा संपन्न झाला. गावातील जेष्ठ नागरीक यांच्या हस्ते पाळणा झुलवण्यात आला.'झुलवा पाळणा, बाळ शिवाजीचा,चंद्र जसा हा इंद्र शोभतो,पुत्र जिजाऊचा,झुलवा पाळणा, बाळ शिवाजीचा,आज उगवला सूर्य नभी नव्या नवलाईचा,'झुलवा पाळणा, बाळ शिवाजीचा या पाळणा गीताने हजारो शिवभक्तांनी छत्रपती शिवरायांना मानवंदना दिली तालुक्यातिल म चिंचोली येथे अशाप्रकारच्या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते सार्वजनिक शिवजन्मोत्सव म चिंचोली च्या वतिने मागील एक महिन्यापासून या कार्यक्रमाचे नियोजन सुरु होते.यात दि 16 फेब्रुवारी गुरूवार रोजी रात्री 8 ते 10.कृषीभूषण ,सौ सिताबाई मोहिते यांचे , दि 17 फेब्रुवारी शुक्रवार रोजी रात्री 8 ते 10 व्याख्याते व कवी शिक्षण आधिकारी विठ्ठल भुसारे यांचे ,दि 18 फेब्रुवारी शनिवावी रोजी रात्री 8ते 10 व्याख्याते शिवचरित्रकार ज्ञानदेव काशीद यांचे व्याख्यान झाले या व्याख्यानाने युवा तरुनांना मोलाचे मार्गदर्शन झाले 19 फेब्रुवारी 3 वाजल्या वाजल्यापासून छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवभक्तांची गर्दी जमायला सुरुवात झाली अशाप्रकारचा सोहळा पार पडत असल्याने सर्वच समाजातील महिला आणि पुरुष या कार्यक्रमाला उपस्थित होते महिला आणि पुरुषांसाठी स्वंतत्र बैठक व्यवस्था या वेळी करण्यात



आली होती छत्रपती शिवाजी महाराज चौकातील पुतळ्याच्या भोवती उभारलेला भगवा शामियाना सर्वांचे लक्ष वेधून घेत होता संपूर्ण पुतळ्याच्या परिसराला आकर्षक फुलांनी सजवण्यात आलेलं होतं या पुतळ्याच्या समोरच पाळणा सजवून ठेवण्यात आला होता. त्यात बाळशिवबांची मूर्ती ठेवण्यात आली होती बाळशिवबाचे हे रुप आपल्या मोबाईल कॅमेऱ्यात टिपण्यासाठी प्रयत्न केले जात होते. शारदाबाई रंगनाथराव खांडे यांच्या हस्ते पाळणा हलवून कार्यक्रम पार पडला. हा सोहळा पार पडल्यानंतर हजारोंच्या संख्यने उपस्थित असलेले शीवभक्त अंत्यत शांततेत परतले.

# सावळदबारा येथे रॅली काढून छत्रपती शिवरायांची जयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे काल छत्रपती श्री शिवाजी महाराज यांची जयंती रॅली काढून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी सपोनि भरत मोरे फर्दापूर पोलिस ठाणे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनचरित्रवर या पुस्तकाचे विद्यार्थ्यांना वाटप करुन त्यांना मार्गदर्शन करण्यात आले.काल रात्री १२ वाजेपासूनच फटाके फोडून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती महोत्सवाची सुरुवात झाली. महिलांनी रात्री मशालीसह छत्रपती शिवरायांचे दर्शन घेतले. आज सकाळपासून असंख्य राजकीय नेते, व्यापारी, युवक. महिला, युवती आणि बालकांनी छत्रपती शिवरायांच्या दर्शनासाठी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ एकाच गर्दी केली होती. छत्रपती शिवरायांना सपोनि भरत मोरे फर्दापूर व माजी सरपंच स्वातीताई भाऊराव कोलते पाटील यांनी पुष्पहार अर्पण करून सर्वांनी त्यांना विनम्र अभिवादन केले. प्रा.जीवन कोलते पाटील व मंडळाच्या अध्यक्ष सुनील माळी आणि मंडळ्याचे



पदाधिकारी काहींनी मोटारसायकल रॅली काढली, मोटारसायकलींवर छत्रपती शिवरायांचे चित्र असलेले झेंडे लागलेले होते. अत्यंत उत्साहात शिवजयंती साजरी झाली.तद्नंतर गावातील सर्व नागरिकांनी छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करुन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मिरवणुकीला गावातून सुरवात करण्यात आली.मोठ्या आनंदात छत्रपती शिवराया वाजतगाजत ढोलताशांच्या गजरात मिरवणूक काढण्यात येऊन चौका चौकात महिलांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचे आरती करून दर्शन घेतले.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या घोषणाबाजीने सावळदबारा नगरी दुमदुमून गेली होती. कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये यासाठी फर्दापूर येथील सहायक पोलिस निरीक्षक भारत मोरे यांनी व बिट जमादार मिरखॉं तडवी, शिवदास गोपाळ यांनी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. याप्रसंगी सहाय्यक पोलीस निरिक्षक भरत मोरे ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी होऊन उपस्थित होते.

# सततच्या पाठपुराव्याने पिंपळगाव काळे येथील सभामंडप कामाला सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज

**पिंपळगाव काळे :** 5 लक्ष रुपयांचे कोळी समाज सभामंडप काम गेल्या 4 वर्षा पासून प्रलंबित व संथ गतीने सुरू असलेल्या तसेच अर्धवट स्थिती मध्ये सोडलेल्या सभा मंडपाचे काम पूर्ण करण्यासाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने अनेक वेळा सार्वजनिक बांधकाम विभाग जळगांव (जा) यांना निवेदन, आंदोलनाचे इशारे, फोनकॉल, प्रत्यक्ष भेटी देऊन कामाचा पाठपुरावा करण्यात करण्यात आला.

परंतु दीर्घ प्रतीक्षेनंतर आज कोळी समाज सभामंडपाचे 'डोम शेड' च्या सभामंडपाच्या कामाला सुरुवात झालेली आहे, येणाऱ्या हप्त्या भारामध्ये संपूर्ण सभामंडपाचे काम पूर्ण होईल..अश्या परिस्थिती कोळी समाजबांधवांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या सभामंडपाचे काम तात्काळ पूर्ण व्हावे या साठी वंचित बहुजन आघाडीचे जि. उपाध्यक्ष विजय तायडे, युवा जि.उपाध्यक्ष अनिल रणीत, ता उपाध्यक्ष श्रीकृष्ण गवई ता.उपाध्यक्ष सुनिल बोदडे, देवा दामोदर सर्कल प्रमुख हरिदास वाघमारे, शाखा अध्यक्ष सुधाकर घटे,



इ. तसेच कोळी समाजातील तरुण युवक रवींद्र इनकर, निलेश मांडोकार, अजय काळे, ज्ञानेश्वर सुरळकार, राजू इनकर, दीपक घुळे, निलेश इनकर,सचिन घुळे, दीपक माठे, शिवाजी नावकर, सतिष बावसकर, हरिदास झलटे, महादेव मांडोकार, वैभव भोलनकार, तसेच सभामंडपाचे काम तात्काळ पूर्ण व्हावे यासाठी स्वतःहून पुढकार घेणारे वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते प्रकाश भिसे यांनी सातत्याने हा प्रश्न रेटून धरला व काम पूर्णत्वास जात आहे.

# महापुरुषांचा आदर्श घेवून काम करावे : पूर्व शिक्षण संचालक डॉ. गोविंद नांदेडे

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यासारख्या महापुरुषांनी कधीही जातीभेद मानला नाही, छत्रपती शिवाजी महाराजांनी अठरापगड जातीच्या लोकांना सोबत घेऊन स्वराज्य निर्माण केले तर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जात पात न मानता भारतीय संविधान लिहून प्रत्येकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळवून दिला, अशा महापुरुषांचा आदर्श समोर ठेवून प्रत्येकाने काम केले तरच समाज सुधारेल असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे पूर्व शिक्षण संचालक डॉ. गोविंद नांदेडे यांनी केले. दि.१९ फेब्रुवारी रोजी नायगाव तालुक्यातील दरेगाव येथे जनसेवक स्व.बबन खंडू दरेगावकर यांच्या पुण्यस्मरणार्थ सोनू बबन दरेगावकर यांच्यावतीने वयोवृद्धांना आधाराच्या काठी वाटपाचा कार्यक्रम आयोजित केला होता, कार्यक्रमासाठी उदघाटक म्हणून, सुप्रसिद्ध मराठी हास्य कलावंत मा. गजानन गिरी आणि सौ. गुंजन गजानन गिरी तर कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड. एन. एम. रानवळकर होते, प्रमुख मार्गदर्शक म्हणून पुढे बोलताना पूर्व शिक्षण संचालक डॉ. नांदेडे म्हणाले की, महात्मा बसवेश्वर, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी जाती व्यवस्था प्रथा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. या महापुरुषांनी आंतरजातीय विवाह प्रोत्साहन दिले, त्यांनी जातीपातीला थारा दिला नाही, त्यामुळे आजही त्यांचे नाव अमर आहे. त्यामुळे यापुढे प्रत्येकाने आंतरजातीय विवाह विरोध न करता प्रोत्साहन दिले पाहिजे, तरच जातीयता नष्ट होईल. शिक्षण घेण्यासाठी वय नसते, प्रत्येकाने जेवढे होईल तेवढे शिक्षण घेतले पाहिजे. शिक्षण घेतल्याने दारिद्र्य संपते, सन्मानाने जगण्याचा अधिकार प्राप्त होतो, उच्च पदावर जाता येते आणि स्वतःची प्रगती साधता येते.





# प्राथमिक शिक्षक सोसायटीच्या निवडणुकीत विकास आघाडीचा विजयी झेंडा

आधुनिक केसरी न्यूज

**सांगोला :** प्राथमिक शिक्षक सोसायटीच्या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये तालुका विकास आघाडी पॅनलने गुरु सेवा पॅनलचा दारुण पराभव करत एकाहाती सत्ता मिळवली आहे. विकास आघाडीच्या या यशामुळे सांगोला तालुक्यात परिवर्तनाची नांदी झाली आहे, असे शुभेच्छापर मत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष मा. आ. दीपक आबा साळुंखे पाटील यांनी व्यक्त केले. शिक्षक सोसायटीच्या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये तालुका विकास आघाडीच्या नवनिर्वाचित संचालकांचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी च्या वतीने मा. आ. दीपकआबा साळुंखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली युवक नेते डॉ. पीयूषदादा साळुंखे पाटील यांनी सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी नवनिर्वाचित संचालक यांनी कार्यतपस्वी आ. कै. काकासाहेब साळुंखे पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करून आशीर्वाद घेतले. सुमारे ८०० सभासद असणाऱ्या सांगोला तालुका प्राथमिक शिक्षक सह. पतसंस्था अर्थात तालुका सोसायटीच्या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये तालुका सोसायटी विकास आघाडी सांगोलाचे सर्वच्या सर्व 13 उमेदवार १०० ते १२५ मतांच्या फरकाने निवडून आले असून गुरुसेवा पॅनलचा धुव्वा उडाला आहे. काल सांगोला येथे जि.प. शाळा पुजारवाडी येथे निवडणूक होऊन लगेचच मतमोजणी झाली.त्यामध्ये तालुका सोसायटी विकास आघाडीच्या सर्व उमेदवारांना ४२० ते ५०१ मते प्राप्त झाली असून गुरुसेवा पॅनलच्या सर्व उमेदवारांना ३२० पर्यंतच मजल मारता आली. त्यामुळे सर्वच्या सर्व तेरा जागांवर दणदणीत विजय मिळाला. यामुळे शिक्षकांमध्ये एक नवचैतन्याचे वातावरण पसरले आहे. ६२ वर्षांची परंपरा असलेल्या तालुका सोसायटीला निवडणुकीने आता नवे कारभारी मिळणार आहेत. सांगोला तालुका प्राथमिक शिक्षक समिती, सांगोला तालुका प्राथमिक शिक्षक संघ थोरात गट व जुनी पेन्शनच्या पाठिंबावर उभा राहिलेले तालुका सोसायटी विकास आघाडी पॅनल ने दणदणीत यश मिळवून पूर्वीच्या सत्ताधाऱ्यांना मोठी चपराक दिलेली आहे.



# ड्राय डे निमित्ताने अवैध दारू विक्रीवर कारवाई; 76,200 रुपयांचा साठा जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** सहाय्यक पोलीस अधीक्षक महक स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली येथील पथकाने शिवजयंती निमित्ताने उपविभाग वैजापूरमधील तीन पोलीस स्टेशन हद्दीत ड्राय डे निमित्ताने अवैध दारू विक्री वर धाडी टाकत कारवाया केल्या आहेत. शिवजयंती उत्सवाच्या अनुषंगाने ड्राय डे निमित्ताने वैजापूर उपविभागातील पोलीस स्टेशन वैजापूर, वीरगाव, शिऊर या ठिकाणी वेगवेगळ्या हॉटेल, ढाबे याठिकाणी महक स्वामी सहाय्यक पोलीस अधीक्षक उपविभाग वैजापूर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या पथकाने छापे मारून एकूण 16 केसेस केल्या असून यात देशी,विदेशी,गावठी दारूचा 76,200 रुपयांचा साठा जप्त करण्यात आला असून संबंधित 17 जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.यात प्रामुख्याने वीरगाव पो.स्टे.ने 4 केसेस, शिऊर पो.स्टे.ने 3 केसेस, वैजापूर पो.स्टे. ने 01 आणि वैजापूर उपविभागीय पोलीस कार्यालय येथील पथकाने 8 केसेस केलेल्या आहेत.

तसेच शिवजयंती निमित्ताने कमल 68/69 महाराष्ट्र पोलीस कायदा अन्वये 13 व्यक्तींना ताब्यात घेऊन कार्यवाही करून सोडण्यात आले. शिवजयंती दरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करणार नाहीत या करिता खबरदारी म्हणून 61 जणांवर कलम 149 सी.आर.पी.सी. अन्वये नोटिस देऊन पावबंद करण्यात आले असून महक स्वामी सहाय्यक पोलीस अधीक्षक वैजापूर उपविभाग यांनी स्वतः धाडीमध्ये अग्रेसर राहून कारवाई केल्या आहेत. उपविभागात अवैध धंद्यांवर कारवायांचा धडाका कायम ठेऊन अवैध धंदे वाल्यांवर वचक निर्माण करत स पो अ महक स्वामी यांच्या अचानक व धडक मोहिमेमुळे अवैध धंदेवाल्यांचे मुसक्या आवळल्या जात आहेत. कारवाया मुळे शिवजयंती उत्सव हा अत्यंत शांततेत व उत्साहात संपन्न झाला आहे. ही कारवाई सहायक पोलीस अधीक्षक महक स्वामी यांच्या सह पोउपनी श्रीराम काळे, पोलीस अंमलदार पडळकर, गोलवाल, कदम, महिला पोलिस अंमलदार मोठे, गाधेकर व तीनही पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक,अंमलदार यांनी केली आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज जयंतीदिनी डॉ. अमरकुमार तायडे यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज



**मलकापूर :** छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त सार्वजनिक शिवजयंती उत्सव सोहळा आई तुळजाभवानी फाउंडेशन मलकापूरच्या वतीने दरवर्षी मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात येतो त्या अनुषंगाने मलकापूरचे डॉ. अमरकुमार आनंद तायडे हे विविध समाज उपयोगी कार्य करत असतात तसेच भारतीय संविधान जनजागृती अभियान अंतर्गत तरुण पिढीला एक नवीन दिशा देण्याचे मोलाचे कार्य करत आहेत व त्याचे सामाजिक क्षेत्रातात त्यांचेउल्लेखनीय योगदान आहे, त्यांना देशातील विविध पुरस्काराने सन्मानित देखील करण्यात आले आहे. ते करत असलेले कार्य इतरांना दिशादर्शक ठरत आहे. म्हणून आई तुळजाभवानी फाउंडेशन च्या वतीने विदर्भ वैज्ञानिक विकास महामंडळाचे माजी अध्यक्ष चैनसुख संचेती यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन त्यांना गौरव करण्यात आला. त्यावेळी द पीपल्स बहुउद्देशीय संस्थेचे करण विनोद झनके, चंदू पवार, शुभम सावळे, आशिष पवार, पूजा पवार उपस्थित होते.

# शिवरायांनी माणसे जोडून स्वराज्याची निर्मिती केली : प्रा.विशाल गायकवाड

आधुनिक केसरी न्यूज



**वैजापूर :** छत्रपती शिवाजी महाराजानी स्वराज्य निर्मिती करण्यासाठी अत्यंत नियोजन पध्दतीने व दूरदृष्टी समोर ठेऊन अगदी बालपणापासून सवंगडी जोडून व पुढे विश्वासू माणसे जोडून रयतेचे स्वराज्य निर्माण केले असे प्रतिपादन शिव व्याख्याते प्रा,विशाल जी गायकवाड यांनी वैजापूर येथे आयोजित शिव जयंती कार्यक्रमात केले. शिवक्रांती सेना महाराष्ट्र राज्य च्या वतिने हा कार्यक्रम रविवार( ता,१९ ) रोजी छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी आ. प्रा. रमेश पा. बोरनारे, माजी आमदार भाऊसाहेब पा,चिकटगांवकर, उपविभागीय पोलीस अधिकारी महक स्वामी, पो.नि. संजय लोहकरे, माजी नगराध्यक्ष बाळासाहेब संचेती, प्रशांत पा. सदाफळं, कल्याण दांगोडे,सचिन वाणी, दिनेश राजपूत, पारस घाटे, कल्याण दांगोडे यांची प्रमुख उपस्थिती होती. शिवक्रांती सेनेचे प्रदेश अध्यक्ष सुनील बोडखे, प्रदेश कार्याध्यक्ष सोमनाथ मगर, तालुका अध्यक्ष दादा भाऊ घायवट यांनी पाहुण्यांचे शाल टाकून स्वागत केले. प्रास्ताविक सोमनाथ मगर यांनी केले. सूत्र संचलन धोंडीरामसिंह राजपूत यानी तर आभार सुनील बोडखे यांनी मानले.



# महावितरणमध्ये शिवजयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** महावितरणच्या औरंगाबाद परिमंडलात छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती उत्सव समितीतर्फे कर्मचाऱ्यांच्या पाल्यांची वेशभूषा स्पर्धा, व्याख्यान, पोवाडा, मशाल रॅली अशा विविध उपक्रमांनी छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी औरंगाबाद प्रादेशिक कार्यालयाचे प्रभारी सहव्यवस्थापकीय संचालक सचिन तालेवार होते. यावेळी प्रसिद्ध व्याख्याते राहुल गिरी, ग्रामीण मंडलाचे अधीक्षक अभियंता प्रवीण दरोली, अधीक्षक अभियंता ( स्थापत्य ) मोहन काळोगे, प्रभारी सहमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी विश्वास पाटील, जनसंपर्क अधिकारी ज्ञानेश्वर आर्दड, कार्यकारी अभियंता सतीश खाकसे, प्रेमसिंग राजूपत, महेश पाटील, सहायक अभियंता रूपाली पहूरकर, समितीचे सचिव सुनील बनसोड, कोषाध्यक्ष डॉ.कृष्णा काळदाते यांची प्रमुख उपस्थिती होती. सुरुवातीला शिवस्वरांजली शाहिरी कलापथकाचे शाहीर विलासराजे बडक पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी शिवरायांच्या जीवनकार्यावर आधारित स्फूर्तीदायी पोवाडे सादर करून उपस्थितांची मने जिंकली. शिवजयंतीनिमित्त यंदाही कर्मचाऱ्यांच्या पाल्यांसाठी वेशभूषा स्पर्धा घेण्यात आली. त्यात पाल्यांनी राजमाता जिजाऊ, शिवराय, ताराराणी व मावळ्यांची हुबेहूब वेशभूषा साकारल्या. या स्पर्धेत बालगटात कस्तुरी उबाळे-प्रथम, ओमराज कावळे-द्वितीय, अद्वकि तायडे-तृतीय तर तेजस्वी जाधव व शिवम जाधव यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देऊन गौरवण्यात आले. मोठ्या गटात ऋतुजा पिवळ व आराध्या पवार- संयुक्त प्रथम, कार्तिक जाधव व साई मेटे-संयुक्त द्वितीय, संजीत जाधव-तृतीय तर स्नेहा काटे, राधिका देशमुख, राणू रिडलॉन, शिवांशी देशमुख, वैष्णवी कावळे, सोहम फाळके, अदिती जाधव यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देऊन गौरवण्यात आले. स्पर्धेचे परीक्षण प्रा.डॉ.गहिनीनाथ वळेकर यांनी केले. याप्रसंगी कामगार कल्याण मंडळाचा राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल यंत्रचालक रमेश शिंदे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघातर्फे कार्यगौरव पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल जनसंपर्क अधिकारी ज्ञानेश्वर आर्दड, राज्य नाट्य स्पर्धेत अभिनयाचे पारितोषिक मिळाल्याबद्दल पल्लवी गायकवाड व वाणिज्य विषयात पीएचडी प्राप्त केल्याबद्दल डॉ.कृष्णा काळदाते यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. देवगिरी किल्ला ते क्रांती चौकातील शिवरायांच्या पुतळ्यापर्यंत मशाल यात्रा काढून वीजचोरीचे दुष्परिणाम, वीज बचत, वीजबिल भरण्याचे महत्त्व याबाबत जनजागृती करणारे कर्मचारी संजय शाहीर, विनायक देवकर, पुंडलिक सपकाळ, विशाल घायाळ, विवेक बांगर, विनोद तित्तर, नारायण खरात, प्रेमचंद चव्हाण, गणेश पालोदकर, योगेश गायके, विशाल पवार, श्याम मोरे, संतोष शेंगुळे, संतोष फलके, मनीष मगर यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला.

# पंढरपूर नगर परिषदेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी



आधुनिक केसरी न्यूज

**पंढरपूर :** नगर परिषदेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या 393 व्या जयंतीच्या निमित्ताने नगरपरिषदेचे प्रशासक तथा उपविभागीय अधिकारी गजानन गुरव यांच्या शुभहस्ते शिवरायांच्या अश्वारुढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन व अभिवादन करुन साजरी करण्यात आली. यावेळी जय जिजाऊ, जय शिवराय जयघोषांनी परिसर दुमदुमला. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त माजी आमदार दत्तात्रय सावंत, उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम, तहसीलदार सुशिल बेल्हेकर, गट विकास अधिकारी प्रशांत काळे, मुख्याधिकारी अरविंद माळी, उपमुख्यकार्यकारी अधिकारी सुनिल वाळुंजकर यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. तसेच माजी नगराध्यक्ष साधनाताई भोसले, माजी उपनराध्यक्ष नागेश भोसले, युटोपियन शुगरचे चेअरमन उमेश परिचारक तसेच मान्यवर पदाधिकारी, माजी नगरसेवक यांनीही अशावरुढ पुतळ्यास पुष्पहार आर्पण करुन अभिवादन केले. यावेळी 'महाराष्ट्राचे राज्यगीत' रेडिओ स्टार दिलीप टोमके व सहकारी यांनी गायले. यावेळी शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सह्याद्री फार्मसी महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**सांगोला :** सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी मेथवडे येथे श्री छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस संस्थेचे अध्यक्ष डॉ.दिलीपकुमार इंगवले व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मनोजकुमार पाटील, प्रा.एस.एस.काळे यांच्या हस्ते व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत पुष्पहार अर्पण करून प्रतिमेची पूजा करण्यात आली.या कार्यक्रमात डी.फार्म द्वितीय वर्षाच्या कु.डोके स्वामींनी व कु.प्रियांका करे हिने आपल्या मनोगतात, महाराजांचे शौर्य, धाडस, नियोजन व पराक्रमा बदल व महाराजांचे भारतीय इतिहासातील महत्व विशद केले. विद्यार्थ्यांनी दिलेल्या घोषणांनी परिसर दणाणून गेला. त्यामुळे परिसर शिवमय झाला होता. महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार " जय जय महाराष्ट्र माझा" या गीतास महाराष्ट्र राज्य गीत म्हणून मान्यता मिळून त्याची अंमलबजावणी श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीच्या दिवसापासून करायची आहे त्यामुळे या कार्यक्रमात सर्वांनी महाराष्ट्र गीत गायले.यावेळी सर्व विद्यार्थ्यांना व उपस्थितांना महाविद्यालयतर्फे अल्पउपहार देण्यात आला.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालय सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.पी.एम.आडत,प्रा.भारत गरंडे प्रा.आर.एम कोळी व सर्व शिक्षक,शिक्षकेतर व विद्यार्थ्यांचे योगदान लाभले.

